


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६४ वे * अंक ११६ * नांदेड * शनिवार, दि. ३ मे २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

## नांदेडसह २६ जिल्ह्यांत पावसाचा अंदाज



**मुंबई (प्रतिनिधी)**– राज्यातील वातावरणात सातत्यानं बदल होत आहे. कुठं उन्हाचा तडाखा जाणवत आहे, तर कुठं ढगाळ वातावरण होत असल्याची स्थिती निर्माण झाली आहे. दरम्यान, पुढील आठवडाभर राज्यात नेमकं कसं वातावरण राहील याबाबतची माहिती ज्येष्ठ हवामान अभ्यासक माणिकराव खुळे यांनी दिली आहे. पुढील आठवडाभर राज्यात अवकाळीचे वातावरण राहणार असल्याची माहिती माणिकराव खुळे यांनी दिली आहे.

ज्येष्ठ हवामान अभ्यासक माणिकराव खुळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्रातील संपूर्ण कोकण, खान्देश, नाशिक, नगर पुणे सातारा सांगली सोलापूर, धाराशिव बीड नांदेड, गडचिरोली भंडारा गोंदिया चंद्रपूर नागपूर वर्धा अमरावती अशा २६ जिल्ह्यात आज शनिवार दिनांक ३ ते १० मे पर्यंतच्या आठवड्यात ढगाळ वातावरण राहून अगदीच किरकोळ ठिकाणी एखाद्या–दुसऱ्या दिवशी वीजा, वारा व गडगडाटीचे वातावरण राहून, झालाच तर अगदीच किरकोळ पावसाची शक्यता जाणवत असल्याचे खुळे म्हणाले. दरम्यान, शेतकऱ्यांनी विशेष असे घाबरून जाऊ नये. केवळ सावधानता बाळगावी असे खुळे म्हणाले.

**१० मेपर्यंत मोसमी वारे अंदमानात दाखल होणार**

अंदमान आणि निरोबार बेटांवर दाखल होणाऱ्या मोसमी वाऱ्यांच्या धर्तीवर देशातील मान्सूनचं प्रमाण आणि त्याचा वेग याविषयीचे अंदाज वर्तवण्यात येतात. सहसा मे महिन्याच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यामध्ये मोसमी पावसाच्या आगमनाची अपेक्षा असते. यावेळी मात्र जणू तो सर्वांचीच विनवणी ऐकत आठवडाभर आधीच दाखल होणार असल्याची चिन्हं आहेत. अगदी तारखेचाच विषय म्हणावा तर, यंदा १० मे पर्यंत मोसमी पाऊस अंदमान निकोबार इथं दाखल होण्याची शक्यता आहे.

या वातावरणाचा प्रभाव विदर्भातील ७ जिल्ह्यात विशेष जाणवू शकतो, तसेच एखाद्या दुसऱ्या दिवशी किरकोळ गारपीटीचीही शक्यता नाकारता येत नसल्याची माहिती माणिकराव खुळे यांनी दिली आहे. सध्या महाराष्ट्रात दिवसाचे कमाल तापमान ३८ डिग्री तर काहीं ठिकाणी विशेषतः छत्रपती संभाजीनगर, धाराशिव ह्या जिल्ह्यात ४० डिग्रीच्या दरम्यान जाणवते. सदरचे तापमान जळगाव, जेऊर सोलापूर अकोला अमरावती वर्धा ब्रम्हपुरी वगळता जवळपास सरासरी इतकेच जाणवत असुन आज पासूनच्या आठवड्यात महाराष्ट्रात हे तापमान अजुन एखाद्या दोन डिग्रीने खालावण्याची शक्यता आहे. उन्हाची ताप त्यामुळे अधिक सुसह्य जाणवेल, असे वाटते. दरम्यान, सध्या अनेक जिल्ह्यात तापमानाचा पारा ४० अंशाच्या पुढे जात असल्याचे चित्र देखील दिसत आहे.

## नांदेड पोलीस परिक्षेत्र कार्यालय राज्यात द्वितीय

### आयजी शहाजी उमाप यांचा महाराष्ट्र दिन कार्यक्रमात सन्मान

**नांदेड (प्रतिनिधी)**– राज्याचे मुख्यमंत्री यांनी १०० दिवसांचा सात कलमी सुधारणा कार्यक्रम आखून दिला होता. यात नांदेड पोलीस परिक्षेत्र कार्यालयाने राज्यात द्वितीय क्रमांक मिळविला आहे. महाराष्ट्रदिनी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांचा पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते याबद्दल सन्मान करण्यात आला.



राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दि. ७ जानेवारी २०२५ रोजी सर्व शासकीय कार्यालयांना, कार्यालयीन सुधारणा करण्यासाठी १०० दिवसांचा सात कलमी सुधारणा कार्यक्रम आखून दिला होता. सदर कार्यक्रमांतर्गत, कार्यालयासाठी संकेतस्थळ, कार्यालयीन सुधारणा, नागरिकांसाठी पुरवण्यात येणाऱ्या सेवांचे सुलभिकरण, जुन्या अभिलेखांचे निंदनीकरण व निर्लेखन, कालबाह्य वस्तू व वाहनांची विल्हेवाट, कार्यालयाने राबविलेल्या नाविन्यपूर्ण योजना इत्यादी विषयांवर कामकाज करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. उपरोक्त कार्यक्रम पूर्ण करण्यासाठी ठरवून दिलेली शंभर दिवसांची मुदत दि. १६ एप्रिल रोजी संपल्यानंतर, परीक्षेत्रीय कार्यालयाने केलेल्या कामगिरीचे मूल्य मापन प्रथमतः पोलीस महासंचालक कार्यालयाकडून करण्यात येऊन, त्यातून (३) परिक्षेत्रीय पोलीस महानिरीक्षक/उपमहानिरीक्षक कार्यालयांची निवड करण्यात आली होती. यात, नांदेड परिक्षेत्रीय कार्यालयाची देखील निवड करण्यात आली होती. दि. २४ एप्रिल रोजी, भारतीय गुणवत्ता परिषद यांनी नांदेड पोलीस परिक्षेत्रीय कार्यालयाची पाहणी करून कामकाजाचा आढावा घेतला होता. परिक्षेत्रीय कार्यालयाने केलेल्या कार्यालयीन सुधारणा, परिक्षेत्रीय कार्यालयापासून थेट पोलीस ठाण्यांपर्यंत सुरू केलेली ई-टपाल व्यवस्था, गुन्हे अभिलेखांचे संगणकीकरण करून, तपासावर देखरेख ठेवण्यासाठी सुरू केलेली Eagle Eye Crime Investigation monitoring ही प्रणाली, विविध प्रकरणांत नागरिकांना शिघ्रतेने सेवा देण्यासाठी सुरू केलेली कालबद्ध निर्गती मोहीम, ग्राम पातळीवर नागरिकांच्या सहभागातून सुरू केलेली व्यसनमुक्त गांव मोहीम, उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या पातळीवर सुरू केलेली तक्रार निवारण केंद्रे, पोलीस ठाणे पातळीवर राबविलेले तक्रार निवारण दिन, इत्यादी कामकाजाची परिषदेने दखल घेतली होती.

भारतीय गुणवत्ता परिषदेने महाराष्ट्र दिनी यासंबंधीचा निकाल घोषित केला असून त्यातून, राज्यातील सर्व पोलीस परिक्षेत्रांतून द्वितीय येण्याचा मान नांदेड परिक्षेत्र कार्यालयास मिळाला आहे.

## कोलकात्यात भीषण आगीत १४ जणांचा होरपळून मृत्यू

**कोलकाता (प्रतिनिधी)**– मंगळवारी रात्री कोलकात्यातील फलपट्टी मच्छुआ भागातील एका हॉटेलमध्ये लागलेल्या आगीत १४ जणांचा मृत्यू झाला. आग आटोक्यात आली आहे. २२ जणांना वाचवण्यात आले आहे.

याबाबत बोलताना पोलीस आयुक्त मनोज वर्मा म्हणाले की, रात्री सव्वा आठ वाजता ऋतुराज हॉटेलमध्ये आग लागली. माहिती मिळताच अग्निशमन दल आणि पोलिस पथके घटनास्थळी पोहोचली आणि बचावकार्य सुरू केले. आतापर्यंत १४ मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. अपघाताच्या चौकशीसाठी एक विशेष पथक तयार करण्यात आले आहे. हॉटेलच्या चौथ्या मजल्यावर बसवलेल्या वीज मीटरमध्ये शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

## नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयाची सर्वोत्तम कामगिरी, राज्यात पाचवा क्रमांक

### छत्रपती संभाजीनगर विभाग राज्यात अव्वल क्रमांक

**नांदेड (प्रतिनिधी)**– १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा मोहिमेच्या पहिल्या टप्प्याचा निकाल काल जाहीर झाला. सर्वोत्कृष्ट कामगिरी बजावलेल्या महाराष्ट्रातील जिल्हाधिकारी कार्यालयात नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयाने ६६.८६ गुण मिळवून राज्यात पाचवा तर छत्रपती संभाजीनगर विभागात प्रथम क्रमांक पटकाविला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनानुसार प्रत्येक कार्यालयाला १०० दिवसांचा कृती आराखड्यानुसार कार्यालयीन सुधारणा करण्याबाबत निर्देश दिले होते.

या १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणांचा भारतीय गुणवत्ता परिषद कॉलिटी कॉन्सिल ऑफ इंडिया यांच्यामार्फत या मोहिमेचे मुल्यमापन करण्यात आले आहे. यामध्ये संकेतस्थळ अद्ययावत, सुकर जीवनमान, स्वच्छता, तक्रार निवारण, कार्यालयीन सोयी-सुविधा, क्षेत्रीय कार्यालयांना भेटी, ई-ऑफिस प्रणाली, आर्थिक व औद्योगिक गुंतवणुकीस प्रोत्साहन, अधिकारी



कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी आणि कृत्रीम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर, नाविन्यपूर्ण उपक्रम या निकषाच्या आधारे पहिल्या टप्प्याचा निकाल काल १ मे रोजी जाहीर झाला.

## हल्ल्याच्या भीतीने पाकव्याप्त काश्मीरमधील मदरशांना १० दिवसांची सुट्टी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)**– जम्मू-काश्मीरमधील २२ एप्रिल रोजी झालेल्या पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा प्राथमिक तपास अहवाल एनआयएने तयार केला आहे. एनआयएच्या तपास अहवालात पाकिस्तानी दहशतवादी संघटना लष्कर, आयएसआय आणि पाकिस्तानच्या लष्कराच्या कटाचे पुरावे सापडले आहेत. बेताब खोऱ्यात दहशतवाद्यांनी त्यांचे शस्त्रे लपवल्याचे तपासात उघड झाले. एनआयएने ओव्हरग्राउंड कामगारांच्या संपर्कांची यादी तयार केली. ओजीडब्ल्यू विरुद्ध प्रशासकीय आणि न्यायालयीन कारवाईची तयारी सुरू आहे.

प्राथमिक तपास अहवालात हल्ल्यात सहभागी असलेल्या दोन दहशतवाद्यांचा उल्लेख आहे. हाश्मी मुसा आणि अली भाई उर्फ तल्हा भाई या नावाचा समावेश आहे. हाश्मी मुसा आणि तल्हा भाई हे पाकिस्तानचे नागरिक आहेत, दहशतवादी पाकिस्तानी हँडलर्सच्या संपर्कात होते. पाकिस्तानकडून मार्गदर्शक सूचना मिळत होती. आयएसआयच्या आदेशावरून लष्करच्या मुख्यालयात पहलगाम हल्ल्याबाबत कट रचण्यात आला होता. त्यामुळे पहलगाम हल्ल्यात पाकिस्तानचाच हात असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे भारताकडून अधिक आक्रमक भूमिका घेणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

पाकिस्तान कसा घाबरला आहे याचे पाच पुरावे काल एबीपी माझानं प्रेक्षकांना दाखवले आणि त्यात आता आणखी एकाची भर पडली आहे. बिथरलेल्या पाकिस्ताननं पाकव्याप्त काश्मीरमधल्या मदरशांना १० दिवसांची सुट्टी दिली आहे. नरेंद्र मोदी आणि हवामान अशा दोन आव्हानांचा आम्ही सामना करतोय, असं स्पष्टीकरण पाकिस्तानच्या धार्मिक विभागाचे प्रमुख हाफिज नजीर अहमद यांनी दिलं आहे.

या एफआयआरमध्ये हल्ल्याचा तपशीलवार घटनाक्रम नमूद करण्यात आला आहे. २२ एप्रिलला दुपारी १ वाजून १० मिनिटांनी सुरु झालेला हल्ला २ वाजून २० मिनिटांपर्यंत सुरु होता. हल्ल्यानंतर १० मिनिटांत म्हणजे दुपारी अडीच वाजता एफआयआर दाखल झाला. दहशतवाद्यांना पाकस्थित सूत्रधारांकडून सूचना मिळत होत्या, असंही एफआयआरमध्ये म्हटलंय. हल्ल्यासाठी बेकायदेशीरपणे मिळवलेले ऑटोमॅटिक हत्यारे वापरण्यात आली. दहशतवाद्यांविरुद्ध यूएपीए आणि बीएनएसनुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## काही रेल्वेगाड्या तात्पुरत्या रद्द

**नांदेड (प्रतिनिधी)**– दक्षिण मध्य रेल्वे नांदेड विभागातील काही रेल्वे गाड्या तांत्रीक करणामुळे तात्पुरत्या रद्द करण्यात येत आहेत.

गाडीसंख्या १७४०९/१७४१० आदिलाबाद – नांदेड आदिलाबाद, गाडीसंख्या ५७६५७/५७६५८ पूर्णा – परळी – पूर्णा, गाडीसंख्या ७७६४६/७७६४५ नांदेड – निजामाबाद – नांदेड, गाडीसंख्या ७७६०९/७७६१० अकोट – अकोला – अकोट, गाडीसंख्या ५७६५१ नांदेड – मनमाड ह्या गाड्या दि. ३ मे ते ५ मे दरम्यान रद्द करण्यात आल्या आहेत. तर गाडीसंख्या ५७६५२ मनमाड – नांदेड ही गाडी दि. ४ मे ते ६ मे दरम्यान तात्पुरती रद्द करण्यात आली आहे.

## २९ ऑगस्टला मुंबईला जायचंय; मनोज जरांगे पाटील यांची घोषणा

**जालना (प्रतिनिधी)**– मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी पुन्हा एकदा आंदोलनाचा हत्यार उपसलं आहे. मनोज जरांगे-पाटील यांनी शुक्रवारी माध्यमांशी बोलताना पुढच्या आमरण उपोषणाची तारीख जाहीर केली आहे. २९ ऑगस्टला मुंबई धडक देऊन आमरण उपोषणाला सुरुवात करणार असल्याचे मनोज जरांगे-पाटील यांनी सांगितले आहे.

आज माध्यमांशी बोलताना मनोज जरांगे म्हणाले, सरकारकडं मराठा बांधवांनी समजून घ्या कारणच नाही येत आता आपल्याला त्यामुळे मुंबई सोडायचा आता प्रश्न येत नाही, आंदोलनाची पुढील टप्प्याची रूपरेषा काय असेल ती मात्र सांगत नाही. मुद्दाम सांगत नाही आणि समाजाला माहिती मी जे पाऊल उचलेल ते तुमच्या हिताचा उचलतो. योग्य वेळी सांगितल्यावर तुम्हाला तेवढा एक महिन्याचा परत वेळ राहतोय. २८ ऑगस्टला मी उपोषण करणार तुम्ही सगळ्यांनी फक्त मला सोडायला आले तरी बास असंही पुढे मनोज जरांगे यांनी म्हटलं आहे.

दोन वर्षे झाले तरीही आम्ही संयमाने घेत आहोत. मागील उपोषण सोडताना चार मागण्या तात्काळ अंमलबजावणी केले जाईल असे सांगितलं होतं. आज तीन महिने पूर्ण झाले, कुठल्याही मागण्यांची अंमलबजावणी झाली नाही. मला समाजाच्या लेकराच्या अडीअडचणी बघाव्या लागतात, संयम तरी किती दिवस धरायचा. २९ ऑगस्ट २०२५ ला आम्ही मुंबईत जाणार आहे, असं मनोज जरांगे यांनी म्हटलं आहे. हे मुंबईत गेल्याशिवाय पर्याय निघत नाही हे आमच्या लक्षात आलं आहे. मुंबईत आमरण उपोषण सुद्धा होणार आहे. आपल्या मागण्या मान्य करण्यासाठी आपल्याला त्या ताकतीने उठाव करावा लागणार आहे. सगळ्या मराठा बांधवांनी २९ ऑगस्टच्या अगोदर काम आवरून ठेवा. आता माघारी यायचं नाही, सगळे सोयऱ्याच्या अधिसूचनेला दीड वर्ष पूर्ण झाला आहे. पुढील आंदोलनाची दिशा एक ऑगस्ट रोजी सांगणार आहे.सरकारने आपली शंभर टक्के फसवणूक केली, असंही पुढे मनोज जरांगे यांनी म्हटलं आहे.

यावेळी बोलताना मनोज जरांगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांसह राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांच्यावर देखील हल्लाबोल केला आहे.

## दुधाच्या दरात पुन्हा वाढ

**मुंबई (प्रतिनिधी)**– ग्राहकांना महागाईचा आणखी एक झटका बसला आहे. मदर डेअरीनंतर आता अमूलने देखील दुधाच्या दरामध्ये वाढ केली आहे. अमूलच्या दुधाचे दर दोन रुपयांनी वाढले आहेत. यापूर्वी मंगळवारी मदर डेअरीने दूध दरवाढीची घोषणा केली होती. मदर डेअरीने आपल्या दुधाचे दर प्रति लिटर २ रुपयांनी वाढवले होते. हे वाढलेले दर शुक्रवारपासून लागू झाले आहेत. तर दुसरीकडे त्यानंतर शुक्रवारी अमूलने देखील आपल्या दुधाचे दर प्रति लिटर २ रुपयांनी वाढवले आहेत.

## कर्जमाफीच्या मुद्द्यावरुन बच्चू कडूंचा प्रहार, 'डीसीएम टू सीएम' आंदोलनाची घोषणा

**मुंबई (प्रतिनिधी)**– कर्जमाफीच्या मुद्द्यावर प्रहारचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. कडू यांनी पुढच्या महिन्यापासून आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे. बच्चू कडू यांनी 'डीसीएम टू सीएम' अशा आंदोलनाची घोषणा केली आहे. या आंदोलनांतर्गत बच्चू कडू २ जूनला बारामतीत अजित पवारांच्या घरासमोर 'अर्थसंकल्प वाचन आंदोलन' करत त्यांना कर्जमाफीची आठवण करुन देणार आहेत. बारामतीत सुरु करणाऱ्या आंदोलनाचा शेवट नागपूरमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या घरासमोर आंदोलन करुन केला जाणार असल्याची माहिती कडू यांनी दिली आहे.

अजित पवारांच्या घरासमोरील आंदोलनानंतर बच्चू कडू पुढे टप्प्याटप्याने पंकजा मुंडे, बाळासाहेब पाटील आणि संजय राठोड यांच्या घरासमोर आंदोलन करणार आहेत. यात सर्वात शेवटी कर्जमाफीच्या मुद्द्यावर नागपुरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या घरासमोर आंदोलनाची घोषणा त्यांनी केली आहे. बच्चू कडू यांनी अकोल्यात शुक्रवारी पत्रकार परिषद घेतली. त्यावेळी ते बोलत होते. दरम्यान, कर्जमाफीच्या मुद्द्यावर ७ जुलैपासून तुकडोजी महाराजांचे समाधीस्थळ असलेल्या अमरावती जिल्ह्यातील गुरुकूंज मोझरी किंवा आपलं जन्मगाव असलेल्या कुरळपूर्णा येथे आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा बच्चू कडू यांनी दिला आहे.

दरम्यान, अजित पवारांनी कर्जमाफीचे आश्वासन आपण दिले नसल्याच्या मुद्द्यावरून त्यांनी अजित पवारांवर जोरदार टीका केली आहे. राष्ट्रवादीचा राजकीय बाप असलेल्या भाजपचं कर्जमाफीचं वचन पूर्ण करणं ही अजित पवारांची जबाबदारी असल्याचं ते म्हणालेत.

## सामान्यांसह शेतकऱ्यांच्या हिताच्या योजना राबविण्यावर शासनाचा भर -पालकमंत्री अतुल सावे

### महाराष्ट्र स्थापनेचा ६६ वा स्थापना दिन उत्साहात साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)**– राज्य शासन नेहमी सामान्य नागरिक, शेतकरी यांना केंद्रस्थानी ठेवून त्यांच्या हिताच्या योजना राबवित असते. येणाऱ्या काळामध्ये शेती, माती, कृषी सोबतच अन्य सर्व क्षेत्रांमध्ये शाश्वत विकासावर राज्य शासनाचा भर राहील, असे प्रतिपादन राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी केले.

नव्या सरकारच्या गठनानंतर योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर प्राधान्याने भर असून जिल्ह्यात आतापर्यंत अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना ८१२ कोटींची मदत करण्यात आली आहे. शासनाच्यावतीने सामान्य जनतेच्या व शेतकऱ्यांच्या हिताच्या योजना प्राधान्याने राबविण्यावर भर देण्यात येणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

महाराष्ट्र राज्याचा ६६ वा स्थापना दिनानिमित्त आज त्यांच्या हस्ते नांदेड येथील पोलीस कवायत मैदानावर ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी जिल्ह्यातील जनतेला त्यांनी संबोधित केले. यावेळी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, मनपाचे महेशकुमार डोईफोडे, अपर जिल्हाधिकारी पी. एस. बोरगावकर, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर अन्य वरिष्ठ अधिकारी आणि ज्येष्ठ सन्माननीय नागरिक तसेच स्वातंत्र सैनिक व त्यांचे कुटुंबियाची उपस्थिती होती.

जिल्ह्यात मूल्य शेती अभियान सुरू असून केळी निर्यात संदर्भात कृषी विभाग आणि जिल्हा उद्योग केंद्र कार्यरत आहे. रेशीम शेती, फुल शेतीबाबतही शासनातर्फे जिल्ह्यामध्ये लक्ष घातले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांची कोणतीही रक्कम शिल्लक राहणार नाही यासाठी विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश त्यांनी महसूल विभागाला दिले. तसेच अग्रिस्टॅक योजनेमध्ये सर्व शेतकरी यांनी नोंदणी करावी. तसेच मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० जिल्हयात राबविण्यात येत आहे. सौर ऊर्जा निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणात शासनाने सबसिडी जाहीर केली आहे. प्रत्येक नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पालकमंत्री अतुल सावे यांनी केले.




जलसंधारणाच्या क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात कामे सुरू असून पाऊस पडेपर्यंत कामे पूर्ण करण्याबाबत त्यांनी संबंधित विभागांना सूचना दिल्या आहेत. जिल्ह्यात मुबलक पाणीसाठा उपलब्ध असला तरी नागरिकांनी पाण्याचा वापर जपून करावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. राज्य शासनाने सुरू केलेल्या जलयुक्त शिवार टप्पा-२ मध्ये जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात काम सुरू असुन त्यामध्ये शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे. जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वात गाळमुक्त धरण व गाळयुक्त शेती या अभियानालाही चांगला प्रतिसाद मिळत आहे. उन्हाळ्याचे हे दिवस असून संपूर्ण एक महिना आपल्या हातात आहे. जलसंधारणाच्या सर्व कामांना या काळात पूर्ण करावे, अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

अनेक वर्षांपासून रखडलेल्या लेंडी प्रकल्पाचे काम वेगाने पूर्ण होत आहे. समृद्धी महामार्गाचे भूसंपादन जवळपास पूर्ण झाले आहे. याशिवाय नांदेड-वर्धा रेल्वे मार्गाचे भूसंपादन झाले आहे. शक्तिपीठ मार्गाच्या संदर्भातही स्थानिक लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांच्या मागण्यांना समजून घेऊन हा प्रकल्प पुढे नेण्यासाठी शासन वचनबद्ध असल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले.

समृद्धी मार्गामुळे मराठवाडा आणि विदर्भाच्या अर्थकारणाला कलाटणी मिळणार असून त्यामुळे अशा मोठ्या प्रकल्पाला सकारात्मक दृष्टीने प्रतिसाद मिळावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. मात्र कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्यांचे नुकसान आम्ही होऊ देणार नाही याची ग्वाही त्यांनी दिली.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# भारत पाकिस्तान युद्धः कोणाच्या फायद्याचे?

पाकिस्तान सध्या आर्थिकदृष्ट्या कोल-मडल्याच्या अवस्थेत आहे. महागाईने सामान्य जनतेचे कंबरडे मोडले आहे. आंतरराष्ट्रीय समुदायामध्ये पाकिस्तानची विश्वासार्हता ढासळली आहे. अशा बिकट परिस्थितीत देखील तिथले सत्ताधारी आणि लष्कर आपल्या जनतेला वास्तवापासून दूर ठेवण्यासाठी युद्धखोरीचे ढोल वाजवण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यात पुन्हा पहलगाम येथे झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानविरोधात ठोस राजनैतिक निर्णय घेतले. त्याला प्रत्युत्तर देताना पाकिस्तानने शिमला करार स्थगित करण्याची धमकी देत पुन्हा एकदा युद्धखोरीची भाषा बोलायला सुरुवात केली आहे. खरं तर युद्धकांड कुणाच्याही फायद्याचे नसते. विशेषतः पाकिस्तानसारख्या आर्थिकदृष्ट्या कमकुवत देशासाठी तर नाहीच. स्वतःच्या देशात अन्नधान्याचा तुटवडा असताना, शेकडो कोटींचे युद्धसज्जतेवर खर्च करणे हा एक आत्मघातकी निर्णय ठरेल. पहलगाम हल्ल्यानंतर खुद्द पाकिस्तानातील सामान्य जनतेतूनही दहशत-वाद्यांविरोधात रोष व्यक्त केला जात आहे. त्यामुळेच सत्ताधाऱ्यांनी आपल्या जनतेच्या गरजा ओळखून युद्धखोरीच्या नादाला लागण्याऐवजी देशाच्या विकासासाठी प्रयत्न करायला हवा. १९७१ च्या बांगलादेश मुक्ती युद्धानंतर भारत व पाकिस्तान यांच्यात दीर्घकालीन शांततेसाठी १९७२ मध्ये सीमला येथे ऐतिहासिक करार झाला होता. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी आणि झुल्फिकार अली भुत्तो यांच्या हस्ते या करारावर सह्या झाल्या. या करारानुसार दोन्ही देशांनी कोणत्याही वादग्रस्त मुद्द्यावर एकतर्फी कारवाई न करता चर्चेच्या माध्यमातून तोडगा काढण्याचे ठरवले होते. विशेषतः काश्मीरसारख्या संवेदनशील विषयावर कोणत्याही आंतरराष्ट्रीय हस्तक्षेपाशिवाय द्विपक्षीय संवाद राखणे अपेक्षित होते. परंतु प्रत्यक्षात पाकिस्तानने या कराराचा आदर कायम ठेवला नाही. वारंवार काश्मीर मुद्दा संयुक्त राष्ट्रे आणि इतर आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर नेण्याचे प्रयत्न पाकिस्तानने केले. त्यामुळेच शिमला कराराच्या मूळ गाभ्यालाच सुरुंग लावला गेला. आता भारताने सिंधू जलवाटप कराराच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केल्यावर पाकिस्तानने शिमला करार रद्द करण्याची धमकी दिली आहे. ही प्रतिक्रिया त्यांच्या असुरक्षिततेचा आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील एकाकीपणाचा प्रत्यय देणारी आहे. १९७१ मध्ये भारताने फक्त १३ दिवसांत पाकिस्तानला लाजिरवाणा पराभव पत्करायला लावला होता. सुमारे ९० हजार पाकिस्तानी सैनिक भारतासमोर शरण आले आणि बांगलादेशचा जन्म झाला. या ऐतिहासिक पराभवाची सल आजही पाकिस्तानच्या लष्करशाहीच्या आणि सत्ताधाऱ्यांच्या मनात खोलवर रुतली आहे. त्यामुळेच भारताशी नवा संघर्ष उभारण्याचा मोह पाकिस्तानला स्वस्थ बसू देत नाही. शिमला कराराला स्थगिती देण्याचा इशारा हा केवळ राजकीय स्टंट नसून त्यामागे युद्धसदृश वातावरण निर्माण करण्याचा उद्देश आहे. शिमला करार रद्द झाला तर नियंत्रण रेषेचे (एलओसीचे) पावित्र्यही धोक्यात येऊ शकते. आजवर जिथे काही प्रमाणात शिस्त राखली जात होती तिथे आता गोळीबार, घुसखोरी आणि अराजकता वाढण्याची शक्यता आहे. यामुळे भारतालाही आपल्या संरक्षण नीतीत बदल करावा लागू शकतो. एलओसीच्या पलीकडे पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी तळांवर प्रतिहल्ले करणे भारतासाठी अधिक सुलभ होईल. आत्तापर्यंत संयमाने वागलेला भारत यापुढे अधिक आक्रमक धोरण स्वीकारू शकतो. आपला देश आज मजबूत आहे, सक्षम आहे. आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारताचे वजन वाढले आहे. भारत युद्धाला घाबरत नाही, पण युद्ध टाळण्याचे सामर्थ्य आणि परिपक्वता देखील भारताकडे आहे. त्यामुळे पाकिस्तानने आपल्या जुन्या चाली सोडून शांततेच्या दिशेने पावले उचलली तरच दोन्ही देशांचा खऱ्या अर्थाने विकास शक्य होईल. अन्यथा पाकिस्तान जगाच्या नकाशावरून पुसला जाईल.

# उष्माघात : कारणे आणि उपाय



सर्वसामान्य पणे फेब्रुवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून उन्हाळ्याची चाहूल लागण्यास सुरवात होते आणि मार्च महिण्यापासून प्रखर उष्णता जाणवायला सुरुवात होते. सामान्यपणे तापमान ४५ किंवा त्यापेक्षा अधिक असल्यास उष्मालहर आली आहे असे मानण्यात येते.

आपल्या देशात पूर्वी उष्मालहर येण्याचे प्रमाण कमी होते परंतु अलीकडच्या काळात औद्योगिकिकरण, प्रदूषण, वृक्षतोड, फ्रिज, एसी इत्यादी द्वारा उत्पन्न होणारे क्लोरोफ्लोरोकार्बन (CFC) गॅसेस मुळे ओझोनचा घटत चाललेला थर तसेच पर्यावरणातील झालेल्या बदलामुळे पूर्वी पडणारा वळवाचा पाऊस बंद झाल्यामुळे व एकंदरीतच बदललेल्या ऋतूचक्रामुळे तापमानात झपाट्याने वाढ होत आहे व आपल्या देशात वारंवार उष्मालहर निर्माण होत आहे.२००८ ते २०१८ या मागील दहा वर्षांच्या काळात आपल्या देशात साधारणतः १०,००० लोक उष्माघाता मुळे मृत्युमुखी पडल्याची नोंद करण्यात आली आहे. परंतु एकंदरीत परिस्थिती पाहता हा आकडा अधिक असण्याची शक्यता आहे.

पृथ्वीचे वाढते तापमान कमी करण्यासाठी वृक्ष लागवड, वृक्षसंवर्धन, प्रदूषण नियंत्रण, पर्यावरण पूरक व अपारंपारिक ऊर्जास्त्रोताचा वापर,जल व्यवस्थापन इत्यादी उपाययोजना करता येऊ शकतात. आता आपण वाढत्या तापमानाचे मानवी शरीरावर होणारे दुष्परिणाम अर्थात उष्माघात याविषयी माहिती घेऊयात.

उन्हाळ्यात शरीराचे तापमान जर १०२ ओऋ किंवा त्यापेक्षा अधिक असल्यास उष्माघाताचे प्रथम लक्षण मानले जाते.

**उष्माघाताची लक्षणे**

त्वचा कोरडी पडणे,खूप जास्त तहान लागणे, मळमळ होणे, उलटी होणे, थकवा येणे,ताप येणे, रक्तदाब वाढणे, मानसिक बेचैनी, अस्वस्थ वाटणे ही सर्व उष्माघाताची लक्षणे आहेत.

याशिवाय उष्माघाताची तीव्रता अधिक असल्यास चक्कर येणे, बेशुद्ध अवस्था इत्यादी लक्षणे दिसून येतात व व्यक्ती कोमामध्ये जाण्याची अथवा दगावण्याची श्यक्यता असते.

**उष्माघाताची कारणे**

उष्ण खोलीमध्ये अथवा तीव्र उन्हामध्ये शारीरिक श्रमाची कामे करणे, गच्च कपडे वापरणे,उष्णतेशी सतत सबंध येणे, उष्ण वातावरणात जसे कि काचेचे कारखाने, बॉयलर इत्यादी ठिकाणी श्रमाची कामे करणे, तीव्र उन्हाळ्यात पाणी कमी पिणे ही सर्व उष्माघात होण्याची कारणे आहेत.

तसेच अति मद्यप्राशन, अधिक प्रमाणात चहा व कॉफीसारखे पेय पिणे यामुळे देखील शरीरातील पाणी उत्सर्जित केले जाते.

तसेच मूत्र उत्सर्जन वाढविणारी औषधे (Diuretics) व अन्य काही औषधे जसे की एलर्जी साठी वापरण्यात येणारे औषधे ई. मुळे देखिल अधिक प्रमाणात शरीरातील पाणी उत्सर्जित झाल्यामुळे उष्माघात होऊ शकतो.

मुख्यत्वे ० ते ५ वर्षे वयोगटातील लहान मुले,६५ वर्षे पेक्षा जास्त वय असलेल्या वृद्ध व्यक्ती, श्रम करण्याची सवय नसलेल्या व्यक्ती (अचानक पणे उन्हामध्ये श्रम केल्यास), धूम्रपान, मद्यपान, कॉफी पिणारे व्यक्ती, शेतात श्रम करणारे शेतकरी, कारखान्यात काम करणारे कामगार, उष्णतेच्या संपर्कात असणाऱ्या व्यक्ती इत्यादि लोकांना उष्माघाताचा तडाखा बसू शकतो.

**उष्माघात होऊ नये म्हणून करावयाच्या उपाययोजना**

उष्माघात होऊ नये म्हणून उन्हाळ्याच्या दिवसांत श्यक्यतो सर्व महत्वाची कामे सकाळी लवकर किंवा सायंकाळी करावी अर्थातच उन्हामध्ये फिरणे टाळावे.अत्यावश्यक कामासाठी उन्हाच्या वेळी बाहेर पडणे अपरिहार्य असल्यास डोके,चेहरा पूर्ण झाकल्या जाईल असा पांढरा रुमाल बांधावा. उन्हाळ्यात सैलसर व सुती कपडे शक्यतो पांढऱ्या रंगाची वापरावीत,काळ्या रंगाचे किंवा गडद कपडे वापरू नयेत.उष्ण पेय जसे कॉफी, चहा, मद्यपान ई करणे टाळावे, सवय आहे म्हणून उन्हात जाणे टाळावे, अति व्यायाम करणे टाळावे, उन्हाच्या वेळी बंद गाडीमध्ये थांबणे टाळावे, गच्च कपडे घालणे टाळावे.

उष्माघात टाळण्यासाठी तहान नसेल तरीही भरपुर पाणी प्यावे दिवसभरातून साधारणतः ५ ते ६ लि. थंड पाणी प्यावे, थंड पाण्याची बॉटल नेहमी सोबत ठेवावी, शरीरातील क्षारांची कमी भरून काढण्यासाठी लिंबूपाणी आणि मीठ घ्यावे.देशी थंडपेय जसे की लस्सी, कोकम शरबत, ऊसाचा रस, विविध फळांचे रस, नारळपाणी इत्यादी पेय उन्हाळ्यात उपयुक्त आहेत.

उन्हाळ्यात जास्त पाणी असलेली फळे उदा. टरबूज, खरबूज इत्यादी खाणे उपयुक्त आहे.कामगार व शेतकरी वर्गातील कष्टकऱ्यानी सकाळी व सायंकाळी श्रमाची कामे करून दुपारी उन्हाच्या वेळी विश्रांती घ्यावी. दुचाकी चालवताना डोक्याला पांढरा रुमाल बांधवा, तसेच डोळयांना काळा चष्मा (उन्हाळ्यात वापरण्याचा) वापरावा या सर्व उपाययोजना केल्यास उष्माघात टाळता येणे शक्य आहे.

**उष्माघातावरील उपचार**

आधुनिक वैद्यकीय शास्त्रात उष्माघातावर नियंत्रण ठेवण्यासाठी डोक्यावर थंड पाण्याच्या पट्टया ठेवणे, सम्पूर्ण शरीर थंड पाण्याने पुसून घेणे, रक्तदाब कमी झाला असल्यास सलाईन लावून रक्तदाब वाढविणे, रुग्णास ओआरएस द्रावण देणे या उपाययोजना करण्यात येतात. रुग्णाच्या डोक्यावर, काखेत कापडामध्ये गुंडाळून बर्फ ठेवणे इत्यादी उपचार केल्यास शरीराचे तापमान तात्काळ नियंत्रित होते.रुग्ण उन्हामुळे अत्यवस्थ झाला असल्यास रुग्णास अतिदक्षता विभागात दाखल करून तातडीचे उपचार केले जाऊ शकतात.

**होमिओपॅथीक उपचार**

होमिओपॅथीक उपचार पद्धतीमध्ये उष्माघातावर उपचार करण्यासाठी Nat.Mur, Fer.phos, kali phos,Gelsemium,Glonine,Belladona,Nat.Carb, conite इत्यादी गुणकारी होमिओपॅथीक औषधी उपलब्ध आहेत. कृपया वरील औषधी होमिओपॅथीक डॉक्टरांच्या सल्ल्यानेच घ्यावीत.

**-डॉ. गंगाधर घुटे**
नांदेड
मो ९८९०३७२०७७

# मायबापाच्या सेवेतून परिणामकारक निष्पत्ती

मायबाप देवच असतात. ते आपल्याला जन्माला घालतात. म्हणूनच आपल्याला जग बघता येतं. त्यांनी जर जन्मच दिला नाहीतर आपल्याला जगही पाहता येणार नाही आणि त्याचबरोबर देव, धर्मही हे निर्विवाद सत्य आहे. मायबाप आहेत, म्हणून आपण आहोत. मायबाप नसते तर आपणही नसतो हेही तेवढंच खरं.

आज स्पर्धाकाळ आहे. या स्पर्धाकाळात आपल्याला नोकरीची अत्यंत आवश्यकता आहे. तेही गलेलठ्ठ नोकरीची. कारण आजच्या परिस्थितीत तुटपुंज्या वेतनात काहीच भागत नाही. म्हणून आपण गलेलठ्ठ वेतनाची नोकरी शोधत असतो. मग अशी नोकरी जिथं मिळेल तिथं आपण जात असतो आणि आपले पोट भरीत असतो. मग त्यात आपला देश का असेना किंवा विदेश का असेना. आपला देश असा की, ज्या देशात माणुसकी आहे. माणुसकी आजही टिकून आहे. आजही आपल्या देशानं माणुसकी सोडलेली नसून आजही आपल्या देशातील लोकं आबालवृद्धांची सेवा करतात. त्यातच मायबापाचीही सेवा करतात. परंतु काही काही महाभाग आजही असे आहेत की, जे मायबापांच्या पोटातून जन्म घेतात. त्यांचे उपकार घेतात. लहानाचे मोठे होतात. प्रसंगी सरकारी नोकरीवर लागतात. परंतु ते उपकार विसरतात व त्या उपकारावर कोणी काही बोलल्यास त्याला अपशब्द बोलतात वा अपमान करतात. आज बरेच असे महाभाग आहेत की, जे सरकारी नोकरीवर मोठ्या पदावर आहेत. ते मोठ्या पदावर माय-बापामुळंच गेलेले असून ते उपकार विसरल्याचे निदर्शनास येत आहे. जेव्हा त्यांचे मायबाप म्हातारे झाले, तेव्हा अशा बऱ्याच जणांनी माणुसकी विकून आपल्या मायबापाला वृद्धाश्रमात टाकलेले आहे. हे वृद्धाश्रमातील भेटीदरम्यान दिसून येते. याबाबत एक प्रसंग सांगतो.

प्रसंग असा, यावेळेस अक्षयतृतीयाचा पर्व पार पडला. त्यात एक पोस्ट आली. कशाला आज मायबापांना पुजताय? मथितार्थ असा मायबाप जीवंत होते तेव्हा ज्यांनी सेवा केली नाही. त्यांना मायबापाचे पूजन करण्याचा अधिकार नाही. वास्तविक ही पोस्ट बरोबर होती. ज्यांनी मायबापाची सेवाच केली नाही आपल्या संबंध आयुष्यात, त्यांना सेवेचा अधिकार कशाला? परंतु या पोस्टवर अनेक प्रतिक्रिया आल्या. त्यात कशाला अशा पोस्ट करताय? असाच हेतू होता साऱ्या लोकांचा. बहुतेक तो नोकरीवर असलेल्यांचाच ग्रुप असावा. ज्यांचे मायबाप त्यांच्याजवळ नसावे आणि ज्यांनी आपल्या नोकरीसाठी आपल्याच मायबापांना वृद्धाश्रमात टाकलेलं असावं. होय नोकरी करणाऱ्या मंडळींची हीच गत आहे. जिथं नोकरी करणारी मंडळी आपल्या मुलांनाच दाईकडं सोपवून त्या नोकरीवर जातात. तिथं ती दाई आपल्या मुलांसोबत कसला व्यवहार करते याकडेही ही मंडळी ढुंकून पाहात नाही. ती काय मायबापांना सांभाळणार उतार वयात.

याबाबत एक बहात्तर वर्षाचा व्यक्तीला विचारलं, काका, आपली मुलं दिसत नाहीत. कुठं आहेत? त्यावर तो दुःखी अंतःकरणानं म्हणाला, मी विनाकारणच शिकवलं माझ्या मुलाला. माझी दोन्ही मुलं



आज विदेशात स्थायीक झालेली आहेत. ते इथं येत नाहीत. जास्त पैसा कमवतात ना. त्यावर मी पुन्हा म्हटलं, तुम्ही त्यांच्याकडे का राहात नाही? पोषत नाहीत का ते? त्यावर ते म्हणाले, पोषतात. परंतु आम्हास तिथं करमत नाही. आजारी पडतो आम्ही. तेथील वातावरण आम्हाला लाभदायक होत नाही. मग कशाला ओझं व्हायचं मुलांवर? मला वाटतं की मी फालतूच शिकवली मुलं. नसती शिकवली तर ती मुलं आजही माझ्याजवळच राहिली असती. म्हातार-पण मोठं भारी. म्हाताऱ्यांची ही कैफियत. बरीच अशी म्हातारी मंडळी मिळतात आणि आपल्या आटलेल्या वेदना सांगत असतात. याबाबत अनेक किस्सेही प्रसिद्ध आहेत. एका शेतकऱ्यांची गोष्ट सांगतो. या शेतकऱ्यानं आपल्या मुलाला शिकवलं. तो मोठा ऑफिसर बनला. त्यानंतर मुलगा ऑफिसर बनताच त्याचा शेतकरी बाप त्याला भेटायला गेला. जेव्हा तो भेटायला गेला. तेव्हा भेटीदरम्यान तिथं सभा चाललेली होती. विचारलं, 'कोण हे?' उत्तर मिळालं, 'माझ्या घरचा नोकर.'


आज मुलांनी असला व्यवहार करु नये मायबापासोबत. ते होते म्हणून आपल्याला जग पाहता आलं. ते तेवढंच सत्य आहे. त्यांनी आपल्या रक्ताचं पाणी करुन शिकवलं आपल्याला आणि आपण आज ते रक्तच विसरलो तर आपल्या जगण्याला काहीच अर्थ उरत नाही. तसंच त्यांची सेवा न करता आपण देवधर्म कितीही पुजले तरी ते पुण्य ठरत नाही. मायबापाची सेवा हीच इश्वरसेवा आहे. ते होते म्हणून आपल्या देव कळला. देवाचा आकार कळला. ते जर नसते तर आपला जन्मही झाला नसता, आपल्याला देवही कळला नसता व देवाचा आकारही. बरेचशी अशी लेकरं आहेत की, मायबाप जीवंत असतात, तेव्हा किंचीतही सेवा करीत नाहीत आणि ते नसल्यावर त्यांची सोनेरी रंगात भव्यदिव्य फोटो बनवतात. अशी फोटो बनवतात की जी सुबक व सुंदर असते. सारखी पाहाविशी वाटते. तसेच ते महाभाग आपल्या मायबापाला आपल्या मायबापाची सेवा न करता ते मरण पावल्यावर त्यांची दर-वर्षी नित्यनेमानं पितृमोक्ष अमावस्या व अक्षयतृतीयेला पूजा करीत असतात. खरंच याला काय म्हणावे? दिखाऊपणा की आत्मीयता. याबाबत काही बोलल्यास नक्कीच राग येतो अशा उभययंतांना. हा दिखावाच असतो. त्यात आत्मीयता नसतेच. लोकांनी आपल्याला नावबोटं ठेवू नये म्हणून. म्हणतात की ती प्रथा आहे. मग मायबापाची सेवा करणं ही प्रथा नाही का? काही काही मायबाप तर मायबापाच्या मृत्यूनंतर भिंतीवर त्यांची आठवण म्हणून फोटोही लावत नाहीत.

महत्वाचं म्हणजे काही काही लोकं असेही असतात की, जे आपल्या स्वतःच्या मायबापाची सेवा करीत नाहीत. परंतु इतरांची जास्त सेवा करतात. परंतु कोणाची वा इतरांची सेवा नाही केली एकदाची तरी चालेल, ज्यानं जन्म दिला त्या मायबापाची सेवा करावी. त्यांच्या सेवेनच सातजन्माचं पुण्य लाभतं. जो सेवा करेल, तो मेवा खाईल या वृत्तीप्रमाणे ती सेवा केल्यास असं पुण्य लाभतं की, त्या पुण्यातून आपण सदैव सुखी होतो. आपलं आयुष्यही सुखदायक होतं आणि आपल्याला आजार-पाजार होत नाहीत. पर्यायानं सांगायचं झाल्यास आपण आपलं व आपल्या मुलाबाळाचं आयुष्य त्या पुण्यानं मंगलमय बनवू शकतो हे तेवढंच खरं आहे.

**-अंकुश शिंगाडे**
नागपूर
मो. ९३७३३५९४५०

# हिंदी चित्रपटांचे अपयश : प्रेक्षकांच्या बदलत्या मानसिकतेला ना साजेशा कथा, ना सादरीकरण!





गेल्या काही वर्षांत हिंदी चित्रपटसृष्टी (बॉलिवूड) प्रेक्षकांच्या अपेक्षांपासून अधिकाधिक दूर जाताना दिसते आहे. २०२३ ते २०२४ या कालावधीत हिंदी चित्रपटांच्या कमाईत तब्बल १३ टक्क्यांची घट झाल्याचा अहवाल माध्यमांतून समोर आला आहे. यापैकी सुमारे ३० टक्के कमाई ही दक्षिणेकडील चित्रपटांच्या हिंदी डब आवृत्तींमुळे झाली आहे. हे चित्र बॉलिवूडसाठी निश्चितच चिंताजनक आहे.

आज प्रेक्षकांना मूळ हिंदी चित्रपट फारसे रुचत नाहीत. जे काही चित्रपट चालत आहेत, तेही बहुतेकवेळा मूळ हिंदी नसून डब किंवा प्रेरित स्वरूपातले असतात. विशेषत: आजची तरुण पिढी ही अधिक सजग, परिपक्व व माहितीसमृद्ध झाली आहे. तिच्या अपेक्षा केवळ चमकधमक आणि मोठ्या नावांवर थांबत नाहीत. म्हणूनच अनेकदा मोठ्या स्टार्सच्या, मोठ्या बजेटच्या चित्रपटांना अपयशाचा सामना करावा लागत आहे.

सध्या हिंदी चित्रपट उद्योग आर्थिक अडचणीत सापडला असून थिएटर मालकांनाही तोटा सहन करावा लागत आहे. वर्षभरात प्रदर्शित होणाऱ्या दहा चित्रपटांपैकी नऊ चित्रपट चालत नाहीत. संपूर्ण वर्षात फारतर तीन-चार चित्रपट चांगली कमाई करतात. या अपयशामागे काही मूलभूत कारणे स्पष्टपणे दिसून येतात.

एक महत्त्वाचे कारण म्हणजे हिंदी चित्रपट बदलत्या काळाशी आणि प्रेक्षकांच्या बदलत्या जाणिवांशी जुळवून घेण्यात अपयशी ठरत आहेत. याउलट दक्षिणेकडील चित्रपटसृष्टी ही अधिक वेगाने आणि प्रभावीपणे या बदलाशी समरस होत आहे. ओटीटी प्लॅटफॉर्मच्या आगमनानंतर प्रेक्षकांच्या पसंतीचं गणित बदललं आहे. ओटीटीवर दर्जेदार कथा, नव्या शैलीत मांडणी आणि उत्कृष्ट अभिनय यामुळे प्रेक्षकांना नवे अनुभव मिळू लागले आहेत. या तुलनेत बॉलिवूडचे चित्रपट फारच पोकळ आणि कालबाह्य वाटतात.

थिएटरमध्ये जाऊन चित्रपट पाहणारा प्रेक्षक ओटीटीवरच्या चांगल्या चित्रपटांच्या तुलनेत बॉलिवूडकडून फसवणुकीचा अनुभव घेतो. चित्रपटांत कथ्य, विचार, आणि मांडणी यांचा अभाव असल्याने तो नाराज होतो आणि पुन्हा थिएटरमध्ये यायची त्याची इच्छाच मरते. हीच गोष्ट हिंदी चित्रपटांच्या अपयशाला कारणीभूत ठरते.

आजही बॉलिवूडमध्ये जुनाट विषयांची पुनरावृत्ती सुरू आहे हिंदू-मुस्लिम तेढ, पाकिस्तान, काश्मीर, दहशतवाद, बलात्कार, भ्रष्टनेते, अपहरण, बँक लुटी अशा विषयांना अजूनही चिकटून राहणं ही बॉलिवूडची मोठी मर्यादा आहे. नव्या कथा, नव्या विचारांची उब निर्माण करण्याऐवजी साचेबद्ध पद्धतीने चित्रपट बनवले जात आहेत. खरेतर अनेक नवोदित लेखक, दिग्दर्शक व कलाकारांकडे उत्कृष्ट संकल्पना व अभिनय क्षमता आहे, मात्र त्यांना संधी दिली जात नाही. कारण निर्माते कोणताही जोखीम पत्करण्यास तयार नाहीत.

दुसऱ्या बाजूला नेटफ्लिक्स, अमेझॉन यांसारखे ओटीटी प्लॅटफॉर्म नव्या लेखक-दिग्दर्शकांना आणि नवोदित कलाकारांना संधी देत आहेत. त्यामुळेच अनेक दर्जेदार वेब सिरीज निर्माण होऊन प्रचंड लोकप्रिय होत आहेत आणि त्याचवेळी आर्थिक लाभही मिळवत आहेत. त्यामुळे आता बॉलिवूडमधील अनेक मोठे अभिनेते आणि प्रतिष्ठित दिग्दर्शकही ओटीटीकडे वळत आहेत. विशेषतः आजचा तरुण प्रेक्षक हिंदी चित्रपटांपेक्षा वेब सिरीज आणि ओटीटीवरील चित्रपटांकडे अधिक आकर्षित होत आहे.

एकेकाळी हिंदी चित्रपट वास्तवाशी जवळीक साधणारे असायचे. त्यात नक्कल किंवा मोठा खर्च नसूनही, केवळ उत्तम कथानक आणि अभिनयाच्या जोरावर चित्रपट गाजायचे. 'शोले', 'हम आपके हैं कौन', 'रंगीला', 'दिलवाले दुल्हनिया ले जाएंगे' यांसारखे चित्रपट आजही प्रेक्षकांच्या स्मरणात आहेत आणि आजही पुन्हा थिएटरमध्ये दाखवले, तर प्रेक्षक तितक्याच उत्साहाने पाहतील.

आज मात्र निर्माते मेहनत करून नवीन कथा शोधण्याऐवजी, दक्षिणेकडील व हॉलीवूडच्या चित्रपटांची सरळ नक्कल करत आहेत. अशा चित्रपटांना अपयशाची भीती वाटत नाही, पण त्यांच्या पोकळतेचा फटका अखेरीस बॉलिवूडला बसतो आहे.

हिंदी चित्रपटांना पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या मनात स्थान मिळवायचं असेल, तर त्यांना वास्तवाधिष्ठित, नावीन्यपूर्ण आणि सर्जनशील मांडणीची गरज आहे. आजचा प्रेक्षक अधिक सजग आहे, आणि तो केवळ स्टारडमच्या मोहात पडत नाही. त्यामुळे चित्रपटसृष्टीने वेळेवर दिशा बदलली नाही, तर बॉलिवूडला टिकून राहणं अधिकच कठीण होईल.

**-मच्छिंद्र ऐनापुरे,**
जत, जि. सांगली

# मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय जिल्हास्तरीय मदत कक्षाचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते उद्घाटन



**नांदेड (प्रतिनिधी)** – मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालयांमार्फत नागरिकांना द्यावयाच्या मदतीसाठी कार्य करणाऱ्या जिल्हास्तरीय मदत कक्षाचे शुक्रवारी राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात हा कार्यक्रम पार पडला. जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील प्रशिक्षण भवनच्या इमारतीत हा कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे.

यावेळी खा.अशोकराव चव्हाण, खा. रविंद्र चव्हाण, खा. डॉ. अजित गोपछडे, आ. राजेश पवार, आ. जितेश अंतापूरकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, अपर जिल्हाधिकारी पी.एस.बोरगावकर, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निळकंठ भोसीकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, यांच्यासह आरोग्य विभाग व जिल्हाधिकारी कार्यालयाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# 'कंपोस्ट खड्डा भरू, आपले गाव स्वच्छ ठेवू' अभियानास प्रतिसाद

## ठिकठिकाणी लोप्रतिनिधींच्या हस्ते मोहिमेचा उत्साहात शुभारंभ

**नांदेड (प्रतिनिधी)**– 'कंपोस्ट खड्डा भरू, आपले गाव स्वच्छ ठेवू' या विशेष स्वच्छता अभियानाला जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. पहिल्याच दिवशी जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये या अभियानाचा लोकप्रतिनिधींच्या हस्ते उत्साहात शुभारंभ करण्यात आला.



माहूर तालुक्यातील लांजी येथे विधान परिषद सदस्य तथा मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष हेमंत पाटील यांच्या हस्ते शेग्रीगेशन शेडचे उद्घाटन व अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. किनवट तालुक्यातील पिंपळफोडी येथे आ. भीमराव केराम यांनी कंपोस्ट खड्डा भरून अभियानाची सुरुवात केली. कंधार तालुक्यातील बारुळ येथे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी या अभियानाचा शुभारंभ करुन ग्रामदरबारात ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. हदगाव तालुक्यातील बेलमंडळ येथे आ. बाबुराव कोहळीकर यांनीही उपस्थित राहून स्वच्छतेचा संदेश दिला. तर आमदार आनंदराव तिडके बोंढारकर यांनी लोहा तालुक्यातील दगडगाव व नांदेड तालुक्यातील धनगरवाडी येथे हजेरी लावून अभियानाचा शुभारंभ केला.

अर्धापूर तालुक्यातील पिंपळगाव महादेव येथे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या हस्ते शेग्रीगेशन शेडचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी त्यांनी कंपोस्ट खड्डा भरून या अभियानाचा शुभारंभ केला. लोकसहभागातूनच गाव स्वच्छ राहू शकते, असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. त्यांनी वैयक्तिक कचऱ्याचे डस्टबिन वितरित केले व आरोग्य उपकेंद्र व पशुवैद्यकीय दवाखान्यालाही भेट दिली.

अभियानासाठी जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी नारायण मिसाळ यांनी अधिकारी, कर्मचारी व ग्रामस्थांना सक्रिय सहभागाचे आवाहन केले आहे. या उपक्रमात ठिकठिकाणी लोकप्रतिनिधी, सरपंच, गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी, पंचायत समितीचे अधिकारी, कर्मचारी, जिल्हा कक्षातील तज्ञ, सल्लागार, तालुका गट समन्वयक, समुह समन्वय व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# सिडको कार्यालय व मनपा सिडको क्षेत्रीय कार्यालयात महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र दिनाच्या ६६ वा वर्धापनदिन दिनानिमित्त १ मे रोजी सिडको कार्यालय येथे सहाय्यक विकास अधिकारी कपिल राजपूत तर नावा मनपाच्या सिडको क्षेत्रीय कार्यालय येथे उप आयुक्त अजितपाल संधु यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



मनपाच्या सिडको क्षेत्रीय कार्यालय १ मे रोजी सकाळी येथे ६.४५ वाजता उप आयुक्त अजितपाल संधु यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी सहाय्यक आयुक्त डॉ. मिर्झा बेग, कार्यालय अधीक्षक विलास गजभारे, कर निरीक्षक संजय नागापूरकर मारोती सारंग, वसुली लिपीक, मातृ सेवा आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. शिंदे, कार्यालयीन कर्मचारी,आशा वर्कर, माजी नगरसेविका ललिता शिंदे, मुकुंद बोकारे, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, नागरिक उपस्थित होते.

सिडको कार्यालयात सकाळी ७ वाजता सहाय्यक विकास अधिकारी कपिल राजपूत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी सहाय्यक लेखा लिपीक संकेत गिरी, सुरक्षा रक्षक व पत्रकार उपस्थित होते.

गोपाळचावडी ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच सौ. सुरेखा प्रदीप लाखे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपसरपंच साहेबराव सेलुकर, ग्राम विकास अधिकारी पि. डी. उबाळे, अनिल धमणे, आशिर्वाद डाकोरे, ग्रा. पं. सदस्य अशोक अंकुलवार, छाया खटके, पोलीस पाटील श्रध्दा विजय खटके आदी उपस्थित होते.

# लोहा शहरात जगत्ज्योती महात्मा बसवेश्वर महाराज जयंती उत्साहात साजरी



**लोहा (प्रतिनिधी)**– लोहा शहरात सार्वजनिक महात्मा बसवेश्वर महाराज जयंतीविविध सामाजिक उपक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या मुर्तीची मिरवणूक ढोल ताशांच्या गजरात व भजनी मंडळींच्या उपस्थितीत काढण्यात आली.

प्रथम लोहा न.प. प्रांगणात सकाळी ८ वाजता महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या पुतळ्याचा अभिषेक करण्यात आला. माजी पं.स. सभापती बालाजी पांडागळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

जुना लोहा शहरात सकाळी १० वाजता शिवमंदिर येथे माजी आ. रोहिदास चव्हाण यांच्या हस्ते अभिषेक करुन महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या मुर्तीस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या मूर्तीची मिरवणूक काढण्यात आली. लोहा न.प.च्या प्रांगणात शिवानंद महाराज दापशेडकर यांचा दुपारी २ वाजता बसव कथेचा कार्यक्रम झाला. लोहा न.प. ते सार्वजनिक महात्मा बसवेश्वर महाराज जयंती मंडळाच्या वतीने रक्तदान शिबीर घेण्यात आले.

प्रसंगी माजी आ.रोहिदास चव्हाण, एकनाथ पवार, ॲड. अविनाश भोसीकर, वंचितचे जिल्हाध्यक्ष शिवा नरंगले, शरद पवार, चंद्रसेन पाटील यांच्यासह असंख्य नागरिक उपस्थित होते.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवारच्यावतीने महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहण



**नांदेड (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र दिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीने भाग्यनगर येथे माजी शिक्षणमंत्री कमलकिशोर कदम यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष भगवानराव पाटील आलेगावकर, प्रा. डी.बी. जांभरूणकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

कमलकिशोर कदम यांनी महाराष्ट्र दिनाचे महत्व सांगितले. राष्ट्रवादीचे नेते खा. शरदचंद्र पवार यांनी यापुर्वीच देशहितासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासोबत असल्याचे सांगितले आहे.

यावेळी नांदेड जिल्हाध्यक्ष भगवानराव पाटील आलेगावकर यांनी मनोगत व्यक्त करताना जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे संघटन अधिक वाढविण्यासाठी काम करत आहे. तसेच 'व्हीलेज प्रमुख' ही संकल्पना जिल्ह्यात राबवून १५१५ गावांत व्हीलेज प्रमुखांची नियुक्ती करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# जिल्हा न्यायालयात महात्मा बसवेश्वर जयंती साजरी




**नांदेड (प्रतिनिधी)**– दरवर्षीप्रमाणे महात्मा बसवेश्वर जयंती उत्सव समिती व जिल्हा अभिवक्ता संघ नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा व सत्र न्यायलय नांदेड येथे महात्मा बसवेश्वर जयंती उत्हासात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रमूख जिल्हा व सत्र न्यायधीश एस. जी. वेदपाठक यांची उपस्थिती होती. तर प्रमुख वक्ते प्रा. राजेश सोलापूरे यांनी वर्तमान काळातील महात्मा बसवेश्वरांचा विचार व कार्याची प्रासंगिकता या विषयावर व्याख्यान दिले. या प्रसंगी जिल्हा न्यायालयातील सर्व न्यायाधीश, न्यायिक कर्मचारी, विधिज्ञ, जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष ॲड. जी. व्ही. मठपती, अभिवक्ता संघाचे जिल्हाध्यक्ष ॲड. आशिष गोदमगावकर, उपाध्यक्ष ॲड. संजय वाकोडे पाटील ॲड. अमोल वाघ यांची उपस्थिती होती. प्रमूख पाहुण्यांचा अल्पपरिचय ॲड. संगमेश्वर देलमाडे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. अभिजीत कुरे पाटील यांनी केले.

या कार्यक्रमाला ॲड. अनिल नांदेडकर, ॲड. सुरेश देशमूख, ॲड. साईनाथ सुकळकर, ॲड. आकाश किरोळे, ॲड. दामोदर शरणगिरे, ॲड. संतोष हाळदे, ॲड. माधव पाटील, ॲड. बालाजी भुरे, ॲड. पांडूरंग उपासे, ॲड. मंगनाळे, ॲड. चंद्रशेखर नरवाडे यांची उपस्थिती होती.

# संभाजी सोनटक्के यांचे निधन

**उस्माननगर (प्रतिनिधी)**– उस्माननगर (मोठीलाठ) येथील ज्येष्ठ नागरिक तथा व्यापारी संभाजी जळबाजी सोनटक्के (वय ८२ ) यांचे दि. २९ एप्रिल रोजी सायंकाळी साडेपाच वाजता उपचारा दरम्यान निधन झाले.



दि.३० एप्रिल रोजी सकाळी दहा वाजता उस्माननगर येथे त्यांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुले, एक मुलगी जावाई, सुना, नातु असा परिवार असा परिवार आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते राजीव सोनटक्के यांचे ते वडील होत.

# महात्मा बसवेश्वर महान विभूती -आ.केराम




**किनवट (प्रतिनिधी)**– महात्मा बसवेश्वर हे वीरशैव धर्माचे महान विभूती होते. त्यांनी धर्म, समाज तत्त्वज्ञान, वांयय, राजकारण इत्यादी क्षेत्रात केलेले कार्य क्रांतिकारक स्वरूपाचे आहे, असे प्रतिपादन आ.भीमराव केराम यांनी केले.

किनवट येथील महात्मा बसवेश्वर चौकात बुधवारी दि.३० बसवेश्वर जयंती कार्यक्रमात ते बोलत होते, यावेळी भाजपा नेते शिवराज राघू मामा, प्रा.तपन मिश्रा यांनीही महात्मा बसवेश्वर यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.

यावेळी वीरशैव लिंगायत समाजाच्यावतीने आमदार भीमराव केराम, सुधाकर भोयर, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, सुरज सातुरवार, भाजपा शहराध्यक्ष स्वागत आयनेनीवार, भाजपा किनवट तालुकाध्यक्ष उमाकांत कऱ्हाळे पाटील, सतीश नेम्मानीवार, बाळकृष्ण कदम, अमन कुंडगीर यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आनंद सोनटक्के यांनी केले. आभार शिवराज राघू मामा यांनी मानले. यावेळी सतीश बिराजदार, पत्रकार अनिल भंडारे, संजय बिराजदार, राजू वड्डेअप्पा, विश्वनाथआप्पा भंडारे, डॉ. अमोल तोंडारे, विश्वनाथ दुर्गेवार, नीळकंठ भंडारे, गजानन शिवणकर अरुण भंडारे, ठोंबरे आप्पा, बाळू व्यवहारे, चंद्रकांत भंडारे, गणपत आप्पा भंडारे, विजय महाजन, किशन राकोंडे, पत्रकार दत्ता जायभाये, किरण ठाकरे, माधव सूर्यवंशी, शैलेश गटलेवार, माधव शेळगावे, नागनाथ भंडारे, चंद्रकांत भंडारे, नागेश मेंगा, मारुती साकोळे, शत्रुघन भालके, श्याम बेलोरे, अनिल सलगरे, महेश भंडारे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# महाराष्ट्र दिनी विद्यार्थीनिंच्या हस्ते ध्वजारोहण

**वाजेगाव (प्रतिनिधी)**– वाजेगाव बीटमध्ये दरवर्षीप्रमाणे याही वर्षी एक मे रोजी महाराष्ट्र दिनाचे ध्वजारोहण शाळेतील सर्वात वरच्या वर्गातील सर्वात हुशार मुलीच्या हस्ते करण्यात आले. हा अत्यंत महत्त्वपूर्ण, स्त्री शक्तीचा सन्मान करणाऱ्या, मुलींच्या शिक्षणाला बळकटीकरण देणाऱ्या, स्त्री-पुरुष समतेचा पुरस्कार करणाऱ्या नावीन्यपूर्ण उपक्रमाची परंपरा कायम केली आहे येथील संवेदनशील साहित्यिक, शिक्षण विस्तार अधिकारी तथा मनपा शिक्षणाधिकारी व्यंकटेश चौधरी यांनी.

अनेक शासकीय कार्यालयात, शाळेत ध्वजारोहण कोणाच्या हस्ते करावे? कोणास मान पान द्यावा? अशा प्रकारच्या तांत्रिक अडचणी विनाकारण राष्ट्रीय उत्सवात निर्माण होत असतात. या सगळ्या



अनावश्यक बाबींना फाटा देत मुलींच्या शिक्षणाकडे सर्व पालकांनी लक्ष द्यावे, मुली उच्च शिक्षण विनाअडथळा घेऊ शकाव्यात, तसेच मुलींची होणारी उच्च शिक्षणातील गळती कमी व्हावी या उदात्त हेतूंनी प्रेरित असणारा हा उपक्रम कायम कौतुकाचा विषय ठरलेला आहे.

यामध्ये वाजेगाव बीटमधील सर्वच्या सर्व जिल्हा परिषद शाळांमध्ये केंद्रप्रमुख व्यंकट गंदपवाड यांच्या पुढाकारातून, वाजेगाव-निजा फातेमा शेख ताहेर, त्रिकुट-आदिती खिरोजी वडजे, नागापूर-मयुरी मारोती मस्के, पिंपळगाव मिश्री-सुहानी पुयड, वांगी-नंदिनी माणिका जाधव, वाडीपुयड नवीन-शिवांजली परसराम कदम, फत्तेपूर-माया हरी गोंड, वाडीपुयड-गौरी बालाजी पुयड, वडगाव-प्रतिभा पांडुरंग घोरबांड, ब्राम्हणवाडा-अक्षरा धम्मपाल थोरात, इंजेगाव-महेश्वरी धोंडिबा ठोके, पुणेगाव-नंदनी दत्तराम पुयड, सिध्दनाथ-प्रगती सदाशिव अवातिरक या मुलींच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

# 'स्वारातीम' विद्यापीठात महाराष्ट्र दिनानिमित्त कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते ध्वजारोहण



**नांदेड (प्रतिनिधी)**– स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीसमोरील प्रांगणात महाराष्ट्र दिन आणि आंतरराष्ट्रीय कामगार दिनानिमित्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण केले. त्यानंतर त्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यानिमित्त कुलगुरूंनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, मा. व्यवस्थापन परिषद सदस्य, अधिसभा सदस्य, विद्यापरिषद सदस्य, अधिष्ठाता डॉ. एम.के. पाटील, डॉ. पराग खडके, डॉ. चंद्रकांत बाविस्कर, डॉ. डी. एम. खंदारे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, वित्त व लेखाधिकारी मोहमद शकील अब्दुल करीम, नवोपक्रम नवसंशोधन व सहचर्य विभागाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर, ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सूर्यप्रकाश जाधव, क्रीडा विभागाचे संचालक डॉ. भास्कर माने, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी यांच्या समवेत विद्यापीठातील शिक्षक, विद्यार्थी, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. माध्यमशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. राजेंद्र गोणारकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले.

# धर्म, संस्कृती जतनासाठी भ.परशुरामांचे विचार आचरणात आणावे -प्रा.तपनकुमार मिश्रा

**किनवट (प्रतिनिधी)**– महापराक्रमी भगवान परशुरामाने शास्त्राचे जतन करण्यासाठी हाती शस्त्र घेतले. त्याप्रमाणे आजच्या कलीयुगामध्ये आपला धर्म आपली संस्कृती जतन करण्यासाठी प्रत्येकाने भगवान परशुरामाचे विचार आचरणात आणावेत, असे मत प्रा.तपनकुमार मिश्रा यांनी व्यक्त केले.



अ. भा. ब्राह्मण महासंघाच्यावतीने किनवट येथील बालाजी मंदिरात मंगळवारी दि.२९ भगवान परशुराम जन्मोत्सवानिमित्त अभिवादन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी प्रा. मिश्रा बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संत साहित्याचे अभ्यासक प्रोफेसर मार्तंड कुलकर्णी होते. प्रारंभी वेदशास्त्र पंडित पवनगुरु बोराळकर यांनी मंत्रोच्चारामध्ये यथोचित भगवान परशुरामाची आराधना व पूजा केली. यावेळी समाजातील ज्येष्ठ सदस्य तथा बालाजी मंदिर संस्थानचे मुख्य विश्वस्त गजानन लाटकर यांनी जन्मोत्सवाविषयी प्रास्ताविकातून मत व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोपातून प्रोफेसर डॉ. मार्तंड कुलकर्णी यांनी भगवान परशुरामाची शिकवण आजच्या काळात धर्म रक्षणासाठी तेवढीच महत्त्वाची आहे, त्यासाठी प्रत्येकाने आपापल्या कुटुंबामध्ये भगवान परशुरामाचा विचार त्यांचे जीवन चरित्र आत्मसात करून कार्य करावे, असे आवाहन करून श्रीक्षेत्र माहूर व भगवान परशुराम यांचा संबंध त्यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केला.

कार्यक्रमास प्रदीप वाकोडीकर, ब्राह्मण महासंघाचे अध्यक्ष आशिष देशपांडे, अरुणकुमार वतनीवकील, रेणुकादासराव पांडे, सखाराम पांडे, सुहास कुलकर्णी, सुनील पाठक, नागेश वैद्य, गिरीश पत्की, योगेश वैद्य, विनोद पाटील, प्रशांत कुलकर्णी, विष्णूदास पत्की, रविंद्र चौधरी, विश्वास कोल्हारीकर, समर्थ कुलकर्णी, राजेश्वर जोशी, कृष्णकांत देशपांडे, नीलेश भिलवडीकर, प्रमोद पोहरकर, श्रीराम वळसंगकर,सारंग वाकोडीकर, मनीषा देशपांडे, पूजा जोशी, किरण कुलकर्णी, जान्हवी वळसंगकर, वरलक्ष्मी पाटील, मयुरी बोराळकर, आरती कुलकर्णी, अनुराधा पांडे, कल्पना कुलकर्णी आदींची उपस्थिती होती.

# निमित्ताने....

# पहलगाम हल्ल्याचा बदला घेणे पुरेसे नाही, आतील आव्हान खूप धोकादायक !

अनिकेत वाघमारे

**पहलगाम दहशतवादी हल्ल्याला योग्य उत्तर देण्यासाठी भारत सज्ज आहे. सशस्त्र दलांनी कोणता दृष्टिकोन स्वीकारायचा, कोणत्या लक्ष्यांवर हल्ला करायचा आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे ते किती वेळेत करायचे हे ठरवायचे आहे. पण देशांतर्गत आघाडीवर आणखी मोठे आणि धोकादायक आव्हान उदयास येत आहे. पहलगाम हल्ल्यासाठी जबाबदार असलेल्या दहशतवाद्यांना, त्यांच्या सूत्रधारांना आणि त्यांना पाठिंबा देणाऱ्या पाकिस्तानला धडा शिकवण्यास भारतीय सशस्त्र दल पूर्णपणे सक्षम आहे. पण, घरात आधी लपून बसलेले शत्रू पुन्हा डोके वर काढू शकतात, असा धोका आहे. हा धोका फुटीरतावाद्यांपासून आणि भारतीय असूनही भारताचे शत्रू असलेल्या लोकांपासून आहे.**




## फुटीरतावादी फायदा घेऊ इच्छितात !

गेल्या पाच-सहा वर्षांत जम्मू-काश्मीरमधील परिस्थितीत बरीच सुधारणा झाली आहे. फुटीरतावादी संघटनांची दुकाने बंद करण्यात आली. एकेकाळी काश्मीर खोऱ्याला आपली वडिलोपार्जित मालमत्ता मानणाऱ्या फुटीरतावादी नेत्यांचे धाडस आता भूतकाळात जमा झाले आहे. त्यांच्या आदेशानुसार शुक्रवारच्या नमाजानंतर दगडफेक झाली नाही आणि दररोज हल्लेही झाले नाहीत. पण, पहलगाम घटनेचा बदला म्हणून, जेव्हा भारताने पाकिस्तान, पाकिस्तानी आणि त्यांच्या समर्थकांविरुद्ध कठोर भूमिका घेण्यास सुरुवात केली, तेव्हा अनेक फुटीरतावादी नेत्यांना पुन्हा संधी मिळू लागली आहे.




## अंतर्गत आव्हान भयानक !

पुढे जाण्यापूर्वी, काश्मीर खोऱ्यात एका युट्यूबरने केलेल्या स्टिंग ऑपरेशनची वस्तुस्थिती आपण सादर करूया. यामध्ये, एक महिला युट्यूबर काश्मीरमध्ये कॅबच्या मागच्या सीटवर बसून कॅब ड्रायव्हरशी बोलत आहे. कॅब ड्रायव्हरला कदाचित माहित नसेल की दोघांमधील संभाषण रेकॉर्ड केले जात आहे. संभाषण असे काहीसे घडते - कॅब ड्रायव्हर असे म्हणताना ऐकू येते की, 'जर इथे काही काम नसेल तर मीही बंदूक उचलेन...' युट्यूबर विचारते, 'माझ्यावरही बंदूक उचलशील का?' यावर, कॅब ड्रायव्हर म्हणतो, 'मी तुम्हाला त्यावेळी व्हॉट्सॲपवर दाखवेन... मॅडम... (हसत) इथे येऊ नका... सर्वात आधी मी तुम्हाला इथे सांगतो... त्यावर युट्यूबर म्हणते, की ' मग प्रश्न असा आहे की, 'तू मला आधी उडवून देशील का...?' कॅब ड्रायव्हर मोठ्याने हसतो आणि म्हणतो, '...भीतीमुळे, तू जम्मूहून इथे येणार नाहीस...'

## काश्मीरमध्ये अफवा कोण पसरवत आहे ?


प्रश्न असा आहे की जम्मू आणि काश्मीरमध्ये सक्रिय असलेले लोक कोण आहेत जे तिथे चुकीची माहिती आणि अफवा पसरवत आहेत. आम्ही YouTuber च्या व्हिडिओ आणि कंटेंटमध्ये केलेल्या दाव्यांची कोणत्याही प्रकारे पुष्टी करत नाही. पण, जर यात तथ्य असेल तर ते खोऱ्यात निर्माण होणाऱ्या धोकादायक वातावरणाची भीषणता दर्शवते. कारण, हे सर्व अशा वेळी घडत आहे जेव्हा काश्मीरमध्ये एकेकाळी फुटीरतावादाचा चेहरा असलेले लोक अचानक सक्रिय झाले आहेत.

## हुर्रियत पुन्हा त्यांच्या अजेंड्यावर सक्रिय

या संदर्भात, हुर्रियत नेते मिरवाईज उमर फारूख यांनी बुधवारी दावा केला की काश्मिरींना आत आणि बाहेर सामूहिकपणे शिक्षा दिली जात आहे, जी अन्याय्य आणि अमानवी आहे. काश्मीरमध्ये मोठ्या प्रमाणात अटक, घरे पाडणे आणि कारवाई सुरू आहे. दरम्यान, बाहेर, केंद्रशासित प्रदेशातील लोकांवर, विद्यार्थ्यांवर आणि लहान व्यावसायिकांवर हल्ले केले जात आहेत आणि त्यांना परत जाण्यास भाग पाडले जात आहे. हा तोच मिरवाईज आहे ज्यांच्या हुर्रियतचे विभाजन झाले आहे आणि त्यांच्या अवामी कृती समितीवर (एएसी) अलिकडेच बंदी घालण्यात आली आहे.

## घरातील 'शत्रूं'शी सामना

पहलगाम हल्ल्यात २६ लोकांचा मृत्यू झाला; त्यापैकी एक स्थानिक होता आणि बाकीचे पर्यटक होते. या घटनेत जे काही स्थानिक संबंध उघड झाले आहेत, त्यांच्यावर कडक कारवाई केली जात आहे, जी काळाची गरज देखील आहे. कारण, जर अशा लोकांचा पाठिंबा मिळाला नसता तर पाकिस्तानातून भाड्याने घेतलेल्या गुंडांना एवढी मोठी घटना घडवण्याचे धाडस झाले नसते. मग, दहशतवाद्यांच्या मित्रांविरुद्ध केल्या जाणाऱ्या कारवाईबद्दल विधाने करून असे फुटीरतावादी नेते कोणता संदेश देऊ इच्छित आहेत? त्यामुळे सुरक्षा यंत्रणांसमोरील आव्हान खूप वाढले आहे. त्यांना केवळ शत्रू देशाशीच लढावे लागत नाही, तर घरी बसून देशाच्या शत्रूंशीही लढावे लागते.





# भारताचे पुढचे पाऊल काय असू शकते?

**भारताच्या सुरक्षा यंत्रणेत एक गोष्ट अनेकदा सांगितली जाते. देशाची गुप्तचर संस्था रॉच्या एका गुप्त ठिकाणी एकदा देशाच्या तत्कालीन पंतप्रधानांना नेण्यात आले होते. तिथे रॉ एजन्सी काही मुस्लिम तरुणांना पाकिस्तानमधील गुप्तचर मोहिमांसाठी प्रशिक्षण देत होती. पंतप्रधान तिथून परतल्यावर त्यांनी ताबडतोब ते ऑपरेशन थांबवण्याचे आदेश दिले. यामुळे RAW च्या पाकिस्तानमध्ये काम करण्याच्या क्षमतेवर गंभीर परिणाम झाला**

दिव्या पुजारी

आजही आपण आपल्याच भूमीवर युद्ध लढत आहोत. भारताकडे स्पष्ट रणनीती नाही, अशी खंत अनेक दशकांपासून लष्करी रणनीतीकारांनी व्यक्त केली आहे. पुढील ५ किंवा १० वर्षांत आपल्याला काय साध्य करायचे आहे? आपण किती काळ असे मानसिक आघात सहन करत राहणार आणि त्याला सहिष्णुता म्हणवून स्वतःला सांत्वन देत राहणार? २०१९ मध्ये पुलवामा हल्ल्यानंतर भारताने बालाकोट एअर स्ट्राईकद्वारे शत्रूला प्रत्युत्तर दिले. मग भारताने एक नवीन बेंचमार्क स्थापित केला की आपण आता गप्प बसणार नाही. पण, पहलगाममधील दहशतवादी घटनेवरून हे स्पष्ट होते की आपल्याला त्या मानकांच्या पलीकडे जावे लागेल. या वेळी आपण सर्जिकल स्ट्राईकच्या अदृश्यतेमागे लपू शकत नाही. या वेळी आपले उत्तर निर्णायक आणि पूर्णपणे स्पष्ट असले पाहिजे. पाकिस्तानी सैन्याच्या मुळांवरच प्रहार करण्याची गरज आहे. पहलगाम हे नाव ऐकताच आपल्या मनात काश्मीरच्या सुंदर दऱ्यांचे चित्र येते. हे अमरनाथ यात्रेचे बेस कॅम्प आहे. ही पवित्र यात्रा दोन महिन्यांनी सुरू होणार आहे. पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर यांनी १६ एप्रिल रोजी हिंदूविरोधी विधान केले होते आणि त्यानंतरच हा हल्ला झाला. त्यांनी द्विराष्ट्र सिद्धांताचे समर्थन केले. अशा परिस्थितीत भारताने पहलगामला असे उत्तर दिले पाहिजे की ते सर्वांना दिसेल.

## ठोस रणनीतीचा अभाव

आजही आपण आपल्याच भूमीवर युद्ध लढत आहोत. भारताकडे स्पष्ट रणनीती नाही, अशी खंत अनेक दशकांपासून लष्करी रणनीतीकारांनी व्यक्त केली आहे. पुढील ५ किंवा १० वर्षांत आपल्याला काय साध्य करायचे आहे? आपण किती काळ असे मानसिक आघात सहन करत राहणार आणि त्याला सहिष्णुता म्हणवून स्वतःला सांत्वन देत राहणार? २०१९ मध्ये पुलवामा हल्ल्यानंतर भारताने बालाकोट एअर स्ट्राईकद्वारे शत्रूला प्रत्युत्तर दिले. मग भारताने एक नवीन बेंचमार्क स्थापित केला की आपण आता गप्प बसणार नाही. पण, पहलगाममधील दहशतवादी घटनेवरून हे स्पष्ट होते की आपल्याला त्या मानकांच्या पलीकडे जावे लागेल. या वेळी आपण सर्जिकल स्ट्राईकच्या अदृश्यतेमागे लपू शकत नाही. या वेळी आपले उत्तर निर्णायक आणि पूर्णपणे स्पष्ट असले पाहिजे. पाकिस्तानी सैन्याच्या मुळांवरच प्रहार करण्याची गरज आहे. पहलगाम हे नाव ऐकताच आपल्या मनात काश्मीरच्या सुंदर दऱ्यांचे चित्र येते. हे अमरनाथ यात्रेचे बेस कॅम्प आहे. ही पवित्र यात्रा दोन महिन्यांनी सुरू होणार आहे. पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर यांनी १६ एप्रिल रोजी हिंदूविरोधी विधान केले होते आणि त्यानंतरच हा हल्ला झाला. त्यांनी द्विराष्ट्र सिद्धांताचे समर्थन केले. अशा परिस्थितीत भारताने पहलगामला असे उत्तर दिले पाहिजे की ते सर्वांना दिसेल.



## अंतर्गत स्थिती गंभीर

पाकिस्तानवर कारवाई करण्याबरोबरच, आपल्याला आपल्या अंतर्गत भूमिकेचे पुनर्मूल्यांकन करण्याची देखील आवश्यकता आहे. नवी दिल्लीच्या सर्व प्रयत्नांना न जुमानता, पंजाब-जम्मू सीमेवर पाकिस्तानकडून घुसखोरीच्या घटना अजूनही घडत आहेत. एकीकडे आपण अभिमानाने सांगत आहोत की काश्मीरमध्ये पर्यटकांचा प्रचंड ओघ हे वातावरण सामान्य झाल्याचे लक्षण आहे, तर दुसरीकडे काश्मीरमध्ये निवडून आलेले खासदार पर्यटकांच्या आगमनाला सांस्कृतिक आक्रमण म्हणत आहेत आणि त्यावर कोणतीही भूमिका आपण घेत नाही. ही दुटप्पी वृत्ती. काश्मीरच्या नेत्यांमुळे खोऱ्याचे मोठे नुकसान होत आहे. पण प्रथम, पहलगाम हल्ल्याला प्रत्युत्तर देणे आवश्यक आहे. एका असहाय्य महिलेच्या पतीची हत्या केल्यानंतर एका दहशतवाद्याने तिला "हे मोदींना सांग' असे टोमणे मारले. भारताची प्रतिक्रिया अशी असावी की आपल्या पंतप्रधानांनी ते ऐकले आहे.

# तर चिनी शस्त्रांची पोलखोल !

संजय गुप्ता

**भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानला योग्य उत्तर देण्याची शपथ घेतली आहे. चीनकडून संकेत मिळाल्यानंतर पाकिस्ताननेही युद्धाची तयारी वाढवली आहे. भारतासोबतच्या तणावाच्या पार्श्वभूमीवर चीनने अलिकडेच पाकिस्तानला पीएल-१५ क्षेपणास्त्रांचा पुरवठा केला आहे. जर पाकिस्तान आणि भारत यांच्यात युद्ध झाले तर चिनी शस्त्रांची प्रतिष्ठा पणाला लागेल. पाकिस्तानकडे मेड इन चायना शस्त्रांचा साठा आहे, तर भारताकडे रशिया आणि फ्रान्समधील घातक लढाऊ विमाने आणि इतर शस्त्रे आहेत. चीनपासून अमेरिकेपर्यंत सर्वांनी म्हटले आहे की ही लढाई थांबवली पाहिजे. पण पाकिस्तान दहशतवाद्यांवर कारवाई करण्यास तयार नाही. नाटो देश फ्रान्सचे राफेल लढाऊ विमान आणि चीनची शस्त्रे समोरासमोर येण्याची ही पहिलीच वेळ असणार आहे.**

विश्लेषण

रणजितसिंह राजपूत

पुढील ३६ तासांत भारत हल्ला करू शकतो अशी भीती पाकिस्तानला आहे. जर असे झाले तर संपूर्ण जगाचे लक्ष्य त्यावर असेल. अणुयुद्धाचा धोका म्हणून नाही, तर नाटोची शस्त्रे आणि चीनची शस्त्रे समोरासमोर येणार असल्याने चीनच्या शस्त्रांची पोलखोल होईल म्हणून सगळ्यांचे लक्ष लागणार आहे. भारत आणि पाकिस्तानमधील युद्धात कोणाची शस्त्रे चांगली सिद्ध होतील, हे जगभरातील लष्करी रणनीतीकार पाहतील. यातून धडा शिकून ते आपल्या देशाचे स्वतंत्र धोरण ठरवू शकतात. विशेषतः ते इंडो-पॅसिफिक प्रदेशातील देश जिथे चीन वर्चस्व दाखवत आहे.

## पहिल्यांदाच नाटो-रशियन ब्रह्मास्त्राशी थेट टक्कर होणार म्हणून जिनपिंग तणावात !!



## पाक भूक कशी भागवणार ?

भारत आपल्या सैन्याचे आधुनिकीकरण करत आहे. भारताने रशियाला एस ४०० क्षेपणास्त्र संरक्षण प्रणाली दिली आहे. पाकिस्तानच्या हवाई क्षमतेसाठी हे एक मोठे आव्हान आहे. भारताने स्वतःचे बीव्हीआर क्षेपणास्त्र विकसित केले आहे जे २०१९ मध्ये नव्हते. ते अदृश्य शत्रूंनाही मारण्यास सक्षम आहे. चीन आणि पाश्चात्य देशांच्या शस्त्रास्त्रांमध्ये थेट संघर्ष होणार आहे. यावरून दोघांची ताकद आणि क्षमता दिसून येईल. जर पाकिस्तानच्या चिनी J10C आणि भारताच्या फ्रेंच राफेल लढाऊ विमानांमध्ये संघर्ष झाला तर त्याची जागतिक स्तरावर विश्लेषण केले जाईल. चीनचे J10C PL 15 क्षेपणास्त्र AESA रडारने सुसज्ज आहे आणि ते २०० किमी पर्यंतच्या लक्ष्यांवर मारा करण्यास सक्षम असल्याचे म्हटले जाते. चीनचा दावा आहे की ते ४.५ पिढीचे आहे. त्याच वेळी, राफेलमध्ये AESA रडार आणि उल्का क्षेपणास्त्र देखील आहे जे PL 15 ला मागे टाकण्यास सक्षम आहे. राफेलने अनेक युद्धांमध्ये आपली ताकद सिद्ध केली आहे. या लढाईमुळे चीनच्या शस्त्रांची पोलखोल होऊ शकते. चीन ते विकण्यासाठी जगभर मोहीम राबवत आहे. चीन आणि पाकिस्तानने जेएफ-17 लढाऊ विमान विकसित केले आहे, जे भारताच्या तेजस लढाऊ विमानाशी स्पर्धा करते. ते पीएल १० क्षेपणास्त्रांनी सुसज्ज आहे. भारतीय तेजस विमान अमेरिकन जीई इंजिनने सुसज्ज आहे आणि ते स्वदेशी बनावटीच्या अस्त्र क्षेपणास्त्राने सुसज्ज आहे. दोघांमधील लढाई या विमानांची ताकद उघड करेल. पाकिस्तानने चीनची SH-15 हॉवित्झर तैनात केली आहे, तर भारताकडे दक्षिण कोरियाची K9 वज्र आहे. या लढाईत शस्त्रांचा दर्जा खूप महत्त्वाचा ठरेल, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. चीनच्या शस्त्रांची खरी ताकद आता कळेल. यामुळे चीन तणावात आहे.

## चीनने पाकिस्तानला दिले धोकादायक क्षेपणास्त्र

विश्लेषकांचे म्हणणे आहे की पाकिस्तान चिनी शस्त्रांच्या आधारे आपले वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करेल आणि भारताचे अधिक नुकसान करू शकतो हे दाखवण्याचा प्रयत्न करेल. दरम्यान, माजी भारतीय राजदूत योगेश गुप्ता म्हणतात, भारताला हे संकट आणखी वाढू नये असे वाटते. अमेरिकेतील दक्षिण आशियाई प्रकरणांचे तज्ज्ञ असफदयार मीर म्हणतात की २०१९ पेक्षा भारतात जास्त राग आहे आणि भारतीय नेतृत्व पाकिस्तानला योग्य उत्तर देणार आहे. पाकिस्तानही यासाठी तयार आहे. या लढाईत पाकिस्तान त्यांचे जेएफ १७ तैनात करणार आहे, जे पीएल १५ क्षेपणास्त्रांनी सुसज्ज आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हा तणाव कमी करण्यासाठी विशेष काहीही केलेले नाही. २०१९ मध्ये भारताने पाकिस्तानला दाखवून दिले होते की ते पाकिस्तानच्या आत हल्ला करू शकतात. लष्करी व्यवहार तज्ञ बॉयको निकोलोव्ह म्हणाले, की कोणताही संघर्ष नियंत्रणाबाहेर जाऊ शकतो. भारताकडून शिकून पाकिस्तानने इराण आणि अफगाणिस्तानवर हल्ला केला होता. परंतु अंतर्गत एकतेच्या अभावामुळे पाकिस्तानची क्षमता मर्यादित आहे. जर भारताशी युद्ध झाले तर पाकिस्तानने चीनला पाठिंबा द्यावा, असे चीन नेहमीच इच्छित असेल. या कारणास्तव तो पाकिस्तानला शस्त्रास्त्रांची मदत करेल. भारताविरुद्ध पाकिस्तानला चीन अणु तंत्रज्ञान, जड शस्त्रे, अत्याधुनिक युद्धनौका आणि अगदी लढाऊ विमाने पुरवत आहे.



# सृजन क्षेत्रातील ऑरेंज इकॉनॉमीला गती देण्यासाठी उद्योजकांनी भरीव योगदान द्यावे –प्रधानमंत्री मोदी

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह केंद्रीय मंत्र्यांच्या उपस्थितीत कार्यक्रम



**मुंबई (प्रतिनिधी)**–मुंबईमध्ये सुरू असलेल्या जागतिक दृकश्राव्य मनोरंजन परिषदेमध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विविध देशांमधील प्रमुख उद्योजकांशी संवाद साधला. बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स येथील जिओ वर्ल्ड सेंटरमधील लोटस बॉलरूममध्ये विविध देशातील प्रतिनिधींची गोलमेज बैठक झाली. यावेळी प्रधानमंत्री श्री मोदी यांनी उपस्थित उद्योजकांशी सविस्तर चर्चा केली.

या बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव, केंद्रीय राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन, केंद्रीय सचिव संजय जाजू तसेच उद्योजक ॲडम ग्रॅनिटी, ॲडम मोसरी, आदर पुनावाला, अजय बिजली, अक्षत राठी, अक्षय विधानी, भूषण कुमार, चांघाम किम, चार्ली जेफरी, डायन स्मिथ गंडर, एकता कपूर, प्रिन्स फैजल बिन बंदर बिन सुलतान अल सौद, सुबासकरण अलीराजाह, शूजी उत्सुमी, शरद देवराजन, शंतनू नारायण, संकेत शाह, संजीव गोयंका, राल्फ सिमोन, राजन नवानी, पिरोजशा गोदरेज, नितीश मिटरसेन, अलेक्झांडर झरोव, क्रिस रिप्लेय, दिनेश विजन, लिझवेटा ब्रॉडस्काया, हर्ष जैन, फरहान अख्तर, हार्वेय मासोन, हिरोकी टोटोकी, जोंग बम पार्क, लुईस बॉसवेल, महेश सामत, मार्क रीड, नमीत मल्होत्रा, निल मोहन उपस्थित होते. भारताच्या जीडीपीमध्ये क्रिएटिव्ह इकॉनॉमीचा मोठा वाटा असणार आहे. कंटेंट, क्रिएटिविटी आणि कल्चर यावर आधारित ऑरेंज इकॉनॉमी पुढील १० वर्षांत दुप्पट होणार आहे. या इकॉनॉमीला आणखी गती देण्यासाठी उद्योजकांनी भरीव योगदान द्यावे, असे आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केले.

भारताने सृजन क्षेत्राच्या विकासासाठी उचलेले पाऊल अत्यंत सकारात्मक असून त्यास सर्व उद्योजक उत्स्फूर्तपणे साथ देतील, असा विश्वास सर्व उपस्थित उद्योजकांनी व्यक्त केला.

# ‘एआय’ आणि मनोरंजन क्षेत्रात भारताला नेतृत्वाची संधी –मुख्यमंत्री फडणवीस



**मुंबई (प्रतिनिधी)** – जागतिक स्तरावर मनोरंजनक्षेत्रात ‘एआय’चा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. येत्या काळात नवी मुंबई येथे ‘एआय’ तंत्रज्ञानची शिक्षणनगरी उभारण्यात येणार आहे. त्यामुळे आता ‘एआय’ आणि मनोरंजन क्षेत्राचे जागतिक नेतृत्व करण्याची संधी भारताला मिळणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

वेव्हज परिषदेदरम्यान महाराष्ट्र पॅव्हेलियन येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, वेव्हज परिषदेसारख्या एका व्यासपीठाची जागतिक पातळीवर गरज होती. ही गरज ओळखून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पहिल्या वेव्हज परिषदेचे आयोजन केले आणि त्याचे यजमानपद महाराष्ट्राकडे दिले राज्यासाठी ही एक मोठी संधी आहे.

वेव्हज परिषदेच्या निमित्ताने महाराष्ट्र सरकारने काही अत्यंत महत्त्वाचे सामंजस्य करार () केलेले आहेत. यामध्ये सगळ्यात महत्त्वाचा, एनएसईने () वेव्हज निर्देशांक सुरू केलेला आहे. ४३ कंपन्या, या दृकश्राव्य क्षेत्रातल्या आहेत, या कंपन्यांचा निर्देशांक सुरू झालेला आहे. त्यामुळे या क्षेत्रामध्ये गुंतवणूक करत आणि एकूणच फायनान्शियल इकोसिस्टीम तयार करण्याकरिता हे अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल उचललेले आहे. हा वेव्हज इंडेक्स म्हणजे वेव्हजच्या यशामधला एक मुकुटमणी असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

ऑस्ट्रेलिया आणि न्यूयॉर्क या दोन जागतिक विद्यापीठांसोबत आज सामंजस्य करार केल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंतर्गत, परदेशी विद्यापीठांना देशामध्ये त्यांचे केंद्र उघडण्याची परवानगी मिळाली असून नवी मुंबई इथे सिडकोच्या पुढाकाराने एज्युसिटी उभारण्यात येणार आहे. या एज्युसिटीमध्ये जागतिक दर्जाची १० ते १२ विद्यापीठे आपले कॅम्पस सुरू करणार आहेत. त्यातील दोन विद्यापीठांशी सामंजस्य करार करण्यात आला. सुरुवातीला दीड हजार कोटींची गुंतवणूक होणार आहे. पण भविष्यात ही गुंतवणूक वाढत जाणार आहे. आणखी तीन महत्त्वाच्या विद्यापीठांशी चर्चा सुरू आहे. देशातले जागतिक विद्यापीठ एकत्र असलेले पहिले कॅम्पस नवी मुंबईमध्ये सुरू होत आहे. यासोबत प्राइम फोकससोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे, ज्याच्यामध्ये प्राइम फोकस एक फिल्मसिटी या ठिकाणी तयार करणार आहे, ज्यामध्ये जवळपास ३ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार असून किमान १० हजार लोकांना रोजगार मिळेल. ‘एआय’ () पॉवर आणि जगातली उत्तम तंत्रज्ञानही त्या ठिकाणी असणार आहे.

पनवेल येथे चित्रपट सृष्टी उभारण्यासाठी गोदरेज सोबतही दोन हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीबाबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. एकूण ८००० कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

# महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमच्या माध्यमातून अधिक सेवा देणार – मुख्य सचिव सुजाता सौनिक

**मुंबई (प्रतिनिधी)**– अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून जनतेला ऑनलाईन सेवा देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. मायक्रोसॉफ्ट सोबत देखील यासाठी करार केला आहे. महाराष्ट्र डिजिटल गव्हर्नन्समध्ये देशासाठी एक आदर्श मॉडेल ठरेल, असे मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी सांगितले.

यावेळी वर्ध्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचा सेवादूत प्रकल्पाची सुरुवात केल्याबद्दल, यवतमाळचे जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी अभिप्राय कक्ष सुरू केल्याबद्दल आणि कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी कोल्हापूर जिल्ह्यात पथदर्शी प्रकल्प सुरू केल्याबद्दल यावेळी मुख्यमंत्री यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमचे ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून पद्मश्री शंकर महादेवन, सोनाली कुलकर्णी यांचाही सत्कार करण्यात आला.

यावेळी राज्य सेवा हक्क आयोगाचे मुख्य आयुक्त मनु कुमार श्रीवास्तव यांनी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ च्या अंमलबजावणीच्या गेल्या दहा वर्षातील वाटचालीबाबत माहिती दिली. तसेच या कायद्याच्या जनजागृतीसाठी आयोग व शासन अनेक सुनियोजित नावीन्यपूर्ण उपक्रम राबवणार असून भविष्यात आयोगाने हाती घेतलेल्या व शिफारस केलेल्या उपक्रमांची माहितीही त्यांनी यावेळी दिली. पुणेचे राज्य सेवा हक्क आयोगाचे आयुक्त दिलीप शिंदे यांनी आभार मानले.

## Change In Name

My old name is S MAHATHAB KOUR S.GURUCHARAN SINGH I AM changing AS New Name. MAHETAP KOUR BHAGATSINGH RANDHAWA Hence forth her all correspondence will be done As per her new Neme please consider the same. ADD- C/O BHAGATSINGH RANDHAWA, MAHALJA, MALTEKDI HINGOLI ROAD TARODA BK TARODA BK NANDED MAHARASHTRA 431605

## Name Change Declaration

My old Name is Bhooma Balapurkar, which Now I. am changing as Bhoomanna Honappa Balapurker hence for the my all correspondence should be done as per my New Name Bhoomanna Honappa Balapurker. kindly consider the same Adderess H.No. 1-12-559. Bhimal Niwas. Uday Nagar, Bhagya Nagar Road. Nanded.

## Change In Name

My old name is AARTI VASANT WADJE. I AM changing AS New Name. AARTI VASANTRAO WADJE Hence forth her all correspondence will be done As per her new Neme please consider the same. ADD- D/0 VASANTRAO WADJE BC MALEGAON ROAD NEAR HANUMAN MANDIR TARODA KR NANDED MAHARASHTRA 431601 MO .7030201747

# २८ लाखांच्या बनावट नोटा जप्त

**पुणे (प्रतिनिधी)** – शिवाजीनगरच्या मध्यवर्ती भागात बनावट नोटांचे मोठे रॅकेट उघडकीस आलं आहे. २८ लाखांहून अधिक बनावट नोटा, २ लाखांहून अधिक खऱ्या नोटा आणि अत्याधुनिक नोटा छपाईसाठी वापरलं जाणारं साहित्य पोलिसांनी जप्त केलं आहे. ही संपूर्ण यंत्रणा इतकी व्यावसायिक पद्धतीनं उभी केली गेली होती, की बँकेच्या सीडीएम मशीनलाही हे चलन खऱ्या नोटा समजून स्वीकारत होती.

# सिगारेट उधारीवर न दिल्यानं बेदम मारहाण, हॉटेल चालकाचा मृत्यू

**परभणी(प्रतिनिधी)**– चिहा, सिगारेट उधारीवर न दिल्याच्या रागातून बेदम मारहाण करत हॉटेलचालकाचा खून करण्यात आल्याची घटना घडली आहे. परभणीच्या गंगाखेड शहरातील गोदाकाठावर ही घटना घडली असून तीन जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उधारीवर चहा व सिगरेट न दिल्याच्या रागातून दोन जणांनी हॉटेल चालकाला बेदम मारहाण केली. या मारहाणी मध्ये हॉटेल चालकाचा मृत्यू झाला असून या प्रकरणात तीन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परभणीच्या गंगाखेड शहरातील गोदाकाठावरील घटनेने शहरात खळबळ उडाली आहे.






## पहिली साधारण मंडळ सभा नोटीस

सतनाम सहकारी गृहनिर्माण संस्था म.धनेगांव, ता.जि.नांदेड या संस्थेच्या सर्व सभासदांना सुचित करण्यात येते की, मा.उपनिबंधक, सहकारी संस्था ता.नांदेड यांचे आदेश, दि.१७/०४/२०२५ मधील सुचनांप्रमाणे संस्थेच्या पुनर्जिवनानंतर तात्पुरते संचालक मंडळ व पदाधिकारी निवड करण्याकरीता श्री. बी. बी. बोधगिरे, प्राधिकृत अधिकारी तथा सहकार अधिकारी श्रेणी १ संलग्न उपनिबंधक, सहकारी संस्था ता.नांदेड यांचे अध्यक्षतेखाली संस्थेची पहिली साधारण मंडळ सभा राधास्वामी सत्संग मंडळ, लातूर रोड, धनेगांव ता.जि.नांदेड येथे दि.११/०५/२०२५ रोजी सकाळी ठीक ११.३० वाजता आयोजीत करण्यात आलेली आहे.

तरी सदर पहिल्या साधारण मंडळ सभेस संस्थेच्या सर्व सभासदांनी उपस्थित राहावे ही विनंती.

**(बी. बी. बोधगिरे)**
**प्राधिकृत अधिकारी**
**सतनाम सहकारी गृहनिर्माण संस्था**
**म.धनेगांव, ता.जि.नांदेड**






झाडे लावा
झाडे जगावा









## Change In Name

My old name is SAKHARE AARTI RASTUMARAO. I AM changing AS New Name. ARTI BHIMASHANKAR ALNE Hence forth her all correspondence will be done As per her new Neme please consider the same. ADD- MU.PINGLI PARBHANI POST PARBHANI DIST PARBHANI MAHARASHTRA 431401

## जाहीर प्रगटन

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर बिलोली यांच्या न्यायालयात,किरकोळ दिवाणी अर्ज क्र.७२ /२०२५ पु.ता.९/६/२०२५

अर्जदार–१.अनुसया दत्ता पुरी ,वय–६० वर्षे, व्यवसाय–घरकाम रा.रानसुगांव ता.नायगांव जि.नांदेड

विरुध्द –

गैरअर्जदार –रेणुकाबाई किशन पुरी वय ४० वर्षे व्यवसाय घरकाम रा.रानसुगांव ता.नायगांव जि.नांदेड

विषय – वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मा. न्यायालयात अर्ज दाखल केला असून अर्जदाराचे असे कथन आहे की,अर्जदार ही मयत किशन दत्ता पुरी यांची कायदेशीर वारस आहे. अर्जदार हि किशन दत्ता पुरी यांची आई आहे. मयत किशन दत्ता पुरी यांचा मृत्यू दिनांक २०/१२/२०२१ रोजी झाला. अर्जदार यांनी कथन केले आहे की अर्जदार क्र.१ यांना मयत किशन दत्ता पुरी यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सदरहू अर्जदारांनी न्यायालयात सदर मयतांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे.

तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदारांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत ३० दिवसात या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप / उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील. आज दि.२५ एप्रिल, २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

**आदेशावरून**

**क.लिपीक** **सहा.अधिक्षक**

**सह दिवाणी न्यायालय क.स्तर बिलोली**

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाव्दारे सुचित करण्यात येते की, सौ. सुरेखा लक्ष्मीकांत महाजन, रा. कैलाश नगर, नांदेड (गहाणखत करुन देणार) यांनी खालील मालमत्ता गहाणखत करुन देण्याचे ठरले आहे. सदरील मालमत्तेचे वर्णन खालील प्रमाणे आहे. जे की, मौजे वजिराबाद, नांदेड पैकी मुखेडकर अपार्टमेंट मधील फ्लॅट क्र. १२ क्षेत्रफळ ४४.३३ चौ.मीटर जो की, सीटीएस नं. ३४१३ व मनपा मालमत्ता क्र. २९–७९ या प्लॉटवर बांधलेला आहे. ज्याच्या चर्तु:सिमा पुढील प्रमाणे आहेत. पुर्वेस– आयुर्वेदीक कॉलेजची मोकळी जागा, पश्चिमेस – ओपन डक्ट व नंतर फ्लॅट क्र. १३. दक्षिणेस– गोदावरी मुखेडकर यांचे घर, उत्तरेस – सामायिक भिंत आणि त्यानंतर फ्लॅट क्र. ११ सदरील मालमत्ता सध्याचे मालक सौ.सुरेखा लक्ष्मीकांत महाजन हे माझे पक्षकार बंधन बैंक लिमिटेड, शाखा नांदेड यांच्या हक्कात गहाणखत करणार आहेत.

सध्याचे मालक सौ.सुरेखा लक्ष्मीकांत महाजन यांच्याकडुन १. विक्रीखत क्रमांक ४१०२/१९९८ दिनांक २३.१२.१९९८ रोजीचा मुळ दस्त गहाळ / हरवला आहे, जो की विजय गणेशराव मुखेडकर यांनी वामनराव नाराणराव डोंगरे यांना विक्री केला आहे. २. तसेच विक्रीखत क्र. ४२२५/२०१० मधील पान क्र. १३ हे झालेले आहे. त्यामुळे सदरील जाहीर प्रगटन देत आहे की, खालील स्थावर मिळकती बाबत कुठल्याही प्रकारचे हक्क जसे की खरेदी, अदलाबदल, गहाण ( नोंदणीकृत / संमीक बंधक इ. ), बक्षीस, वारसा, कौटुंबीक व्यवस्था, पोटगी, हिस्सेदारी, ताबा, परवाना, भाडे तत्वावर, भाडे पट्टा, धारण, अधिकार, सुखवाद प्रतिज्ञा, बेबंद इत्यादी किंवा या व्यतिरिक्त इतर कोणत्याही संदर्भात कोणाचेही हक्क गुंतलेले असतील आशा व्यक्तींनी त्यांच्याकडील असणाऱ्या संपूर्ण मूळ कागदोपत्री पुराव्यासहीत माझ्याकडे लेखी निवेदना ०७/ दिवसाच्या आत सादर करावे अशी विनंती करण्यात येत आहे. जर ०७ दिवसाच्या आत सदरीला लोखी आक्षेप प्राप्त न झाल्यास माझे अशील त्यास जबाबदार राहणार नाही व आपला हक्क सदरील नमुद परिशिष्टातील मिळकती बाबत सोडून दिला किंवा बेबंद केला असे समजण्यात येईल.करीता हे जाहीर प्रगटन

**जाहीर प्रगटन देणार**
**बंधन बँक लिमिटेड**
**शाखा नांदेड**

**मार्फत**
**ॲड.आर.सी.पाडमुख**
**घर क्र.२७५/२१ लेबर कॉलनी नांदेड**
**मो.९०६७३४२९१४**

## जाहीर प्रगटन

सर्व संबंधीत जनतेस कळविण्यात येत आहे की आमचे पक्षकार (१) मनोहर अर्जुनराव थोरात (२) मुरलीधर संभाजी मुळे रा. जवळाबाजार ता. औंढा नागनाथ जि. हिंगोली यांनी संदीप विठ्ठलराव मस्के रा. सिध्देश्वर ता. औंढा नागनाथ जी. हिंगोली यांचाकडुन त्यांचे जाती मालकी व ताब्याचे जि.तु.वि.प. हिंगोली ता. पो. तु. प. स. औंढा नागनाथ पैकी ग्रामपंचायत मौजे तुकंपिंपरी येथील जमीन गट ४२. एकूण क्षेत्रफळ०० हे. २५ आर आकार ००रु.३७ पैसे मधील हिस्सा ०० हे १० आर जमीन ज्याची चतु:सिमा पुर्वेस–कौसाबाई धोंडबाराव पोले व अरुण बापुराव पोले, पश्चिमेस–औंढा–हिंगोली रोड ,दक्षिणेस–मारोती टोपे, उत्तरेस –केशवराव लक्ष्मणराव जगताप

या प्रमाणे वरील वर्णनाचे मालमत्ता शेत, अंतरीक व बाहीय हक्कासह कायमचे खरेदी करण्याचे करार केले असुन सदरील करारा पोटी आमचे पक्षकार यांनी बयाना रक्कम ही दिलेली आहे व आमचे पक्षकार कांही दिवसाचा आत उर्वरीत रक्कम देवून सदर मालमत्ता शेत, संबंधी खरेदीखत करुन घेणार आहे.

तत्पुर्वी संबंधीतांना कळविण्यात येत आहे की सदर मालमत्ता शेत खरेदीस कोणासही कसल्याही प्रकारे आक्षेप किंवा उजर, देवान, घेवान,सरकारी देवान, घेवान, सरकारी, निम सरकारी बोजा इत्यादी असल्यास त्यांनी आपला आक्षेप किंवा उजर जाहीर प्रगटन तारखे पासून ७ (सात) दिवसाचा आत कागद पत्रासह लेखी नोंदवावा, मुद्दतीत तारखे पर्यंत अक्षेप/उजर न आल्यास सदर मालमत्ता/ शेत संबंधी कोणासही आक्षेप किंवा उजर इत्याही नाही असे मानले जाईल व सदर मालमत्ता शेताचे खरेदी खत आमचे पक्षकार यांचे हक्कात करुन घेण्यात येईल नंतर आलेला आक्षेप / उजर इत्यादी आमचे पक्षकार यांच्यावर बंधनकारक राहणार नाही.

**मार्फत**
**ॲड. राशेद अहेमद**
**रा. गोदावरी कॉलनी, शहीद टिपु सुलतान रोड,**
**देगलूर नाका नांदेड. मो. नं. ९९७५५६६७५१**

## जाहीर प्रगटन

माझे पक्षकार स्टेट बैंक ऑफ इंडिया शाखा : आर.ए.सी.पी.सी. नवीन मोंढा, नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून कागदपत्रावरून हे जाहीर प्रगटन देत आहे कि, माझे पक्षकार स्टेट बैंक ऑफ इंडिया शाखा : आर.ए.सी.पी.सी. नवीन मोंढा, नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून कागदपत्रावरून हे जाहीर प्रगटन देत आहे कि, हे कि, १) गणेश पिता बालाजी पडोळे २) किर्ती गणेश पडोळे दोन्ही रा. पळसगाव ता. वसमत जि. हिंगोली यांच्या मालकी व ताबातील नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील मौजे सांगावी बु., नांदेड येथील शेत सर्व्हे क्रं. ३५ पैकी गट क्रं. १११ पैकी प्लॉट क्रं. १९ आहे, ज्याची लांबी दक्षिण–उत्तर पूर्वेकडून ७१ फुट (२१.६४ मीटर) व पश्चिमेकडून ७२ फुट (२१.९५ मीटर) आहे व रुंदी पूर्व–पश्चिम ५० फुट (१५.२४ मीटर) आहे, ज्याचे एकूण क्षेत्रफळ ३५७५ चौ.फुट म्हणजेच ३३२.२४ चौ.मी. ज्याची चतुसिमा खालील प्रमाणे आहे :–पूर्वेस सार्वजिनक रोड आहे, पश्चिमेस – प्लॉट क्रं. १८ आहे. दक्षिणेस – प्लॉट क्रं. २० आहे, उत्तरेस – सार्वजनिक रोड आहे, वरनमूद चतुर्सिमेच्या आतील प्लॉट मिळकत १)गणेश पिता बालाजी पडोळे २) किर्ती गणेश पडोळे यांनी श्री. देवराव सटवाजी डाखुरे यांच्या कडून नोंदणीकृत विक्रीखत क्रं. ३८७०/२०२२ दि.३१/१०/२०२२ रोजी खरेदी केले आहे तसेच श्री.देवराव सटवाजी डाखुरे यांनी श्री.उमाकांत पिता मोतीराम हादगांवकर यांच्या कडून नोंदणीकृत विक्रीखत क्रं. ९२२७/२०१२ दि.३०/१०/२०१२ रोजी खरेदी केले आहे.

हे कि, गणेश पिता बालाजी पडोळे यांच्या कडून लिंक नोंदणीकृत विक्रीखत क्रं. ९२२७/२०१२ दि.३०/१०/२०१२ च्या ‘‘मूळ प्रत (Original Copy)‘‘ दस्त गहाळ झाले आहे. तशी गहाळ नोंद गणेश पिता बालाजी पडोळे यांनी पोलीस स्टेशन विमानतळ ता. व जि. नांदेड येथे दि. २७/०४/२०२५ रोजी दिलेली आहे.

हे कि, गणेश पिता बालाजी पडोळे यांना स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्या कडून बांधकामसाठी ‘‘कर्ज घेवून’’ सदरील मिळकत बँकेच्या हक्कात गहाण ठेवायची आहे.

म्हणून, सर्व हित सबंधित व जनतेस कळविण्यात येते कि, जर सदरील मिळकतवर कोणाचा काही हितसंबंध, बोजा असेल त्या त्या हित संबंधी लोकांनी बँक या जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून सात (०७) दिवसाच्या आत खालील पत्यावर लेखी आक्षेप, उजर कागदपत्रासह नोंदवावा व मुदत संपल्यावर माझे पक्षकार बँक सदरील मालमत्तेवर कर्ज देऊन गहाण करून घेतील व मुदतीनंतर आलेल्या कोणतेही आक्षेपास माझे पक्षकार बँक वर बंधनकारक राहणार नाही यांची सर्व हित संबंधितांनी नोंद घ्यावी म्हणून हे जाहीर प्रगटन दि. २९/०४/२०२५.

**मार्फत**
**ॲड. मधुसूदन पि.लक्ष्मीनारायण शर्मा,**
**रा.मारवाडी गल्ली, वजिराबाद,**
**नांदेड. मो. ९५०३९३१६१७**

**जाहीर प्रगटन देणार**
**स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा**
**आर.ए.सी.पी.सी.नवीन मोंढा नांदेड**

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# मंडळ अध्यक्षांचे पक्ष संघटनेत अनन्यसाधारण महत्व -ना.सावे

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारतीय जनता पक्षात अंत्योदय ही मुळ संकल्पना आहे. अंत्योदयाची परिपूर्ती करायची असेल तर कार्यकर्त्यांनी अधिक जोमाने काम करणे गरजेचे आहे. पक्ष संघटना व कार्यकर्ता यामध्ये मंडल अध्यक्ष यांचे स्थान अनन्यसाधारण आहे, असे प्रतिपादन जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी केले.

भाजपाचे महानगराध्यक्ष अमरनाथ राजूरकर यांच्या पुढाकारातून नव्यानेच निवडूण आलेल्या जिल्ह्यातील मंडल अध्यक्षांचा सत्कार सोहळा येथील कुसूम सभागृहात १ मे रोजी आयोजित केला होता. यावेळी ते बोलत होते.

## नूतन मंडल अध्यक्षांचा सत्कार



यावेळी माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, खा. डॉ.अजित गोपछडे, मराठवाडा संघटनमंत्री संजय कौडगे, आ. भीमराव केराम, आ.ड.श्रीजया चव्हाण, आ. जितेश अंतापूरकर, महानगराध्यक्ष अमरनाथ राजूरकर, जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख, माजी महापौर मंगला निमकर, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा मंगाराणी अंबुलगेकर, माजी महानगराध्यक्ष प्रविण साले, चैतन्य देशमुख, बाळू खोमणे, जिल्हाध्यक्षा संध्या राठोड, बाजार समितीचे सभापती संजय देशमुख लहानकर, रामराव नाईक, प्रा.नंदू कुलकर्णी, प्रवक्ते संतोष पांडागळे, डॉ.शितल भालके, महादेवी मठपती, कविता कळसकर, अनिता हिंगोले, सुमती व्याहाळकर, उमेश चव्हाण, मोहनसिंग तौर, दिलीपसिंघ सोडी, रामराव केंद्रे, विनायक सगर, सदाशिव पुरी, प्रविण गायकवाड, दत्ता कोकाटे, बागड्या यादव, राजू गोरे आदींची उपस्थिती होती.

पालकमंत्री सावे म्हणाले की, माझ्या राजकीय जिवनाची सुरुवात मंडळ अध्यक्षांपासून झाली आहे. त्यानंतर मी आमदार आणि अनेक वर्षांपासून मंत्री म्हणून काम करीत आहे. त्यामुळे मंडळ अध्यक्ष या पदाला कमी लेखू नका. मंडळ अध्यक्षांना भाजपाच्या संघटनपर्वामध्ये मोठे महत्व आहे. आपण स्वतःला पक्ष संघटनेत झोकून देवून काम करा. आपल्या कामाचा विचार नक्की होईल असेही पालकमंत्री अतुल सावे म्हणाले.

### भाजपचा प्राधिकरणाला विरोध –माजी आ.राजूरकर

कार्यक्रमाचे संयोजक व भारतीय जनता पक्षाचे कार्यकारी महानगराध्यक्ष अमरनाथ राजूरकर यांनी त्यांच्या प्रास्ताविकेच्या भाषणातून पक्ष संघटनेच्या मजबुतीकडे लक्ष वेधतांनाच नांदेड शहरासाठी प्राधिकरण आणण्याचा आमच्या कांही मित्रपक्षातील नेत्यांनी घाट घातला आहे. परंतु यास भाजपचा विरोध असणार आहे. भविष्यात महापालिकेची सीमावाढ करून पासदगाव व जवळची खेडी महापालिकेत घ्यावीत व यासोबतच शेजारच्या वाडी बु.ग्राम पंचायतचे स्वतंत्र अस्तित्व कायम ठेवावे, असे सांगतांनाच नांदेड शहराच्या विकासाला बाधा आणणारे प्राधिकरण आम्ही होऊ देणार नाही असे त्यांनी ठणकावून सांगितले. नांदेड उत्तरचे जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख यांचेही भाषण झाले. या सत्कार सोहळ्यास जिल्ह्यातील पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती. त्यानंतर पालकमंत्री सावे, माजी मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण यांनी माजी आमदार अमरनाथ राजूरकर यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. त्यावेळी त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

# भाजपच्यावतीने सिडको क्षेत्रीय कार्यालयावर मोर्चा

## अधिकाऱ्यांच्या अंगावर टाकले पाणी



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** सिडको, हडको भागात अनेक दिवसांपासून पासून पाणी पुरवठा होत नाही. तसेच प्रशासनाने टॅकरव्दारे पाणीपुरवठाही न केल्याने संतप्त महिला व पुरुषांनी सिडको पाण्याची टाकी ते क्षेत्रीय कार्यालयावर रिकामे भांडे मोर्चा काढला. यावेळी भाजपचे वैजनाथ देशमुख, संजय घोगरे, सतिश बस्वदे, संजय इंगेवाड, राजु लांडगे, ललिता शिंदे यांनी जोरदार घोषणाबाजी केली.

सिडको हडको परिसरातील अनेक भागात दहा ते पंधरा दिवसांपासून पाणीपुरवठा बंद आहे. त्यामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. वैजनाथ देशमुख, संजय घोगरे, सतिश बस्वदे, संजय इंगेवाड, राजु लांडगे, ललिता शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सिडको पाण्याची टाकी ते मनपा सिडको क्षेत्रीय कार्यालय येथे मोर्चा काढण्यात आला.

यावेळी पाणी आमच्या हक्काचे, पाणी पुरवठा सुरळीत करा, घोषणा देण्यात आल्या. यावेळी धिरज स्वामी, नारायण कौलंबीकर, विजयाताई गोडघासे, मोनु जोशी, भुजंग मोरे, सुमन पवार, गजानन कते, नितीन वाघमारे, मंगेश कदम, आंनदा वाघमारे, सुरेश मुसळे, शिवराज देशमुख, ऋषीकेश महाजन, उद्योजक माधव डोम्पले, आदी महिला युवक, पुरूष सहभागी झाले होते.

या मोर्चाच्यावेळी क्षेत्रीय कार्यालयात एकही अधिकारी नव्हता. दरम्यान, उशिरा आलेले सहाय्यक आयुक्त डॉ. मिर्झा बेग व पाणीपुरवठा अभियंता प्रकाश कांबळे यांच्यात चर्चा चालु असतांनाच त्यांच्यावर आंदोलकांनी अंगावर पाणी टाकून पाणी द्या हो असा टाहो फोडला. दोन तासांमध्ये पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन देण्यात आला. काही भागात पाणी टँकरने पाणीपुरवठा करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

पाणी पुरवठा प्रश्नी पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या उपस्थितीत दोन्ही अधिकारी यांनी दोन तासांच्या आत पाणी पुरवठा सुरळीत चालू करण्याचे व काही भागात टॅकर व्दारे पाणीपुरवठा व बंद असलेले हातपंप चालू करण्याचे आश्वासन दिले. यावेळी ग्रामीण पोलीस स्टेशन यांच्या वतीने महिला व पोलीस कर्मचारी यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

# अक्षय तृतीयेच्या दिवशी अर्धापूरमधील बालविवाह रोखला, तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** अर्धापूर तालुक्यात बालविवाह लावण्याची तयारी सुरू असतानाच जिल्हा बाल संरक्षण कक्षाच्या आदेशान्वये चाईल्ड लाईनची टीम त्या ठिकाणी पोहोचली आणि होणारा बालविवाह थांबविला. या प्रकरणात ग्रामसेविकेच्या फिर्यादीवरून अल्पवयीन नववधूचे काका आणि अन्य दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर पीडित मुलीचे पुनर्वसन करण्यासाठी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी आर. पी. रंगारी आणि जिल्हा बाल संरक्षण अधिकारी विद्या आळणे पुढील प्रक्रिया करत आहेत.

गुरुवारी दि. १ मे रोजी ११ वाजताच्या सुमारास अर्धापूर तालुक्यातील बेलसर गावातील दगडोजी ऊर्फ नवनाथ भिमराव भोकरे याचा विवाह अल्पवयीन मुलीसोबत बेलसर येथे १२.२५ वाजताच्या सुमारास होणार असल्याची माहिती अनोळखी इसमाकडून जिल्हा बाल संरक्षण कक्षाला मिळाली होती.

# गुरुद्वारा बोर्डाच्या वतीने ६९ वा सामुहिक विवाह मेळावा संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)–** सिंघ साहिब संत बाबा कुलवंत सिंघजी जत्थेदार व समस्त पंजप्यारे साहिबान यांच्या सरप्रस्तीमध्ये व गुरुद्वारा बोर्डाचे प्रशासक डॉ. विजय सतबिर सिंघ यांच्या उपस्थितीत तख्त सचखंड श्री हजूर अबिचलनगर साहिब येथे आयोजित ६९ वा सामुहिक विवाह मेळावा दि.१ मे रोजी हर्षोल्लासात संपन्न झाला. या मेळाव्यात दहा जोडप्यांचा विवाह पार पडला.



यावेळी पंजप्यारे साहिबान यांच्या वतीने मीत जत्थेदार सिंघ साहिब भाई ज्योतिंदर सिंघजी यांनी आपल्या शुभेच्छा व्यक्त करुन ७० व्या सामुहिक विवाह मेळावा २९ आणि ३० नोव्हेम्बर रोजी संपन्न होईल, असे घोषीत केले. याच वेळी गुरुद्वारा बोर्डाचे अधिक्षक गुरुबचन सिंघ यांनीही नवदाम्पत्यांना आपल्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी संत बाबा कुलवंत सिंघजी जत्थेदार तथा समस्त पंजप्यारे साहिबान, संत बाबा बलविंदर सिंघजी, तसेच समाजातील गणमान्य व्यक्ति, गुरुद्वारा बोर्डाचे माजी पदाधिकारी, सदस्य व सामाजिक कार्यकर्ते आदींची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी गुरुद्वारा बोर्डाचे सर्व सहाय्यक अधिक्षक हरजीत सिंघ कडेवाले, रविंद्रसिंघ कपूर, बलविंदर सिंघ फौजी, जयमल सिंघ ढिल्लो व इतर अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.वरिष्ठ सहाय्यक अधिक्षक शरणसिंघ सोढी यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले.

# महाराष्ट्र दिनी महापालिकेत अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सन्मान



**नांदेड् (प्रतिनिधी)–** महापालिकेत उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या संकल्पनेतून दर महिन्याला 'ऑफीसर ऑफ द मन्थ आणि एम्प्लॉयी ऑफ द मन्थ' हा पुरस्कार देण्यात येतो. त्यानुसार महाराष्ट्र दिनी ध्वजारोहण सोहळ्यानंतर आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते 'ऑफीसर ऑफ द मन्थ' हा पुरस्कार देऊन मुख्य उद्यान अधीक्षक तथा क्षेत्रिय अधिकारी डॉ. मिर्झा फरहतुल्ला बेग यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

माहे मार्च २०२५ मध्ये मिर्झा बेग यांनी महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालय क्रं.६ सिडको अंतर्गत वर्षाच्या एकूण वसुलीच्या ४५ टक्के रक्कम अवघ्या तीन महिन्यात वसूल करून, दिलेल्या उद्दिष्टापैकी २० टक्के वाढीव वसुलीच्या अनुषंगाने त्यांनी मागच्या वर्षीच्या तुलनेत ३३ टक्के वाढीव वसुली करून सर्व क्षेत्रीय कार्यालयामध्ये प्रथम क्रमांक पटकाविला आहे.

तसेच माहे मार्च २०२५ मध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल 'एम्प्लॉयी ऑफ द मन्थ' हा पुरस्कार लिपिक गजानन रामचंद्र रासे यांना देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. लेखा विभागातील लिपिक गजानन रामचंद्र रासे यांनी सन २०२४-२५ चे सुधारित आणि सन २०२५- २६ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाचे पावर पॉइंटद्वारे सादरीकरण करून त्याचे उत्तम नियोजन केले.

# जिल्ह्यातील सराईत आठ गुन्हेगार नांदेड जिल्ह्यातून हद्दपार

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात शांतता राखण्यासाठी व गुन्हें अभिलेखावरील सक्रिय तसेच वारंवार गुन्हे करणाऱ्या सराईत आठ आरोपींना नांदेड जिल्ह्यातून सहा महिन्यासाठी हद्दपार केले आहे. ही कारवाई बिलोली पोलिसांनी केली.

सय्यद सैफ सयद सीसर वय ३१ वर्ष रा. इनामदारगल्ली, बिलोली, मोहम्मद झिया मोहमद नवाब कुरेशी वय ३२ वर्ष रा. इदगाह गल्ली, बिलोली, शेख अदनान ऊर्फ मुदशीर शेख नशीर वघ २० वर्ष रा. इनामदारगल्ली, बिलोली, फरीद नवाबसाब कुरेशी वय २५ वर्ष रा. भास्करनगर, बिलोली, इलियास नवाबसाब कुरेशी वय २० वर्ष रा. इदगाहगल्ली, बिलोली, शेख बावा खाजामिया वय ४१ वर्ष रा इदगाहगल्ली, बिलोली, असलम सतार कुरेशी वय २९ वर्ष रा. इदगाहगल्ली बिलोली आणि सयद सोहेल सयद फारुख रा. बळेगाव ता. उमरी जि नांदेड ह. मु. लेबर कॉलनी नांदेड, अशी हद्दपार केलेल्या आरोपींची नावे आहेत. पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांनी सदर हद्दपार प्रस्तावाची पुन्हा सखोल चौकशी करुन आठ सराईत गुन्हेगारांना नांदेड जिल्ह्यातून सहा महिन्यांकरीता हद्दपार करण्याबाबतचे आदेश दि. ३० एप्रिल रोजी जारी केले होते.

# अवैधरित्या म्हैस वर्गीय जनावरांची वाहतूक करणाऱ्या चालकांना अटक; ९६ म्हशींची मुक्तता

**नांदेड (प्रतिनिधी)–** अर्धापूर आणि रामतीर्थ पोलिसांच्या कारवाईमध्ये अवैध म्हैस वर्गीय जनावरांची वाहतूक करणाऱ्या तीन वाहनांची तपासणी केली असता ९६ म्हैशी आढळल्या. पोलिसांनी त्यांची मुक्तता करून म्हैशी व ट्रक जप्त करून तीन चालकांविरुद्ध अर्धापूर आणि रामतीर्थ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. जवळपास ७० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



कंटेनरमधून ३८ रेडकू जनावरे दाटीने कोंबून क्रूरपणे घेवून जात होते. तसेच रामतीर्थ ठाण्याच्या हद्दीत दोन वाहनांतून ४९ रेडकू कोंबून नेले जात होते.

या तीन्ही वाहनांवर अनुक्रमे अर्धापूर ठाण्याचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम व रामतीर्थ पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक शिवराज नरवाडे यांनी कारवाई करीत तब्बल ९६ रेडकुंची मुक्तता केली. अर्धापूर ठाण्यात आरोपी चालक खालील मम्मल (वय २९ राहणार हाऊसवार्ड, मेमाथ राज्य हरियाणा), गयूर बंडू खान (वय ४२ राहणार जामियानगर दक्षिण दिल्ली) आणि मुस्तफा दिन मोहम्मद (वय ३० राहणार मेवाड राजस्थान) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर रामतीर्थ ठाण्यात आरोपी चालक मोहम्मद फुरकान मोहम्मद शरीफ रा.मिगलाना मुजफ्फरनगर आणि विठ्ठल देवराव सुतार (वय ३० रा. बिलाळी पारवा जि. जळगाव) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



कु. दिविशा
हिच्या प्रथम वाढदिवसानिमित्त
खूप खूप आशीर्वाद व शुभेच्छा



:: शुभेच्छुक ::
उपा. विशाखा दिनेश नरवाडे (आई-बाबा),
उपा. निर्मला आनंद नरवाडे,
उपा. रेखाताई विजय पंडित (आजी-आजोबा),
विशाल विजय पंडित (मामा),
प्रियंका नितीन शेळके (आत्या-मामा),
श्रैया बाबुराव मनावर (आत्या),
समस्त नरवाडे व पंडित परिवार.

# महात्मा बसवेश्वरांचा मूळ अनुभव मंटप हैद्राबाद नवाबांच्या ताब्यातून मुक्त करा -प्रा. मनोहर धोंडे

## शिवा संघटनेच्या मागणीला खा.डॉ. अजित गोपछडे व आ. हेमंत पाटील यांचा जाहीर पाठिंबा

**नांदेड (प्रतिनिधी)–** शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनेच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी क्रांतीसूर्य महात्मा बसवेश्वर यांची ८९४ वी जयंती प्रचंड जल्लोषात साजरी करण्यात आली. याप्रसंगी विचारपीठावर प्रा. मनोहर धोंडे यांनी महात्मा बवसेश्वर यांचा मूळ अनुभव मंटप हैद्राबाद संस्थानचा नवाब यांच्या ताब्यातून मुक्त करा, अशी जाहीर मागणी केली. या मागणीला खा.डॉ. अजित गोपछडे आणि आ. हेमंत पाटील यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे.

शिवा संघटनेच्या वतीने महात्मा बसवेश्वरांच्या तैलचित्राची भव्य मिरवणूक काढण्यात आली. सायंकाळी ५ वाजता या मिरवणुकीचा शुभारंभ विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप, पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वरांच्या अर्धाकृती पुतळ्यास व प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आला. याप्रसंगी प्रशासकीय अधिकारी यांचा शिवा संघटनेच्या वतीने शाल, पुष्पहार व दक्षिणेचा प्रबुद्ध महात्मा बसवेश्वर हे पुस्तक देऊन सन्मान करण्यात आला.



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. ढोल-ताशाच्या गजरात मिरवणुकीला प्रारंभ झाला. सदरील मिरवणुकीत तरूण वर्ग व महिला भगिनी यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या व शिवा संघटनेच्या गाण्यावर चांगलाच ठेका धरला. मिरवणूक जिल्हाधिकारी कार्यालय, गांधी पुतळा, गुरूद्वारा चौक, जुना मोंढा, नवीन कौठा मार्गे महात्मा बसवेश्वर यांच्या आश्वारूढ पुतळ्यापर्यंत काढण्यात आली. शेवटी मिरवणुकीचा समारोप व प्रबोधनपर कार्यक्रम घेण्यात आला.

या विचारपीठावर गुरूवर्य पादेश्वर शिवाचार्य महाराज, गुरूवर्य राजशेखर महाराज अहमदपूर हे होते. तर अध्यक्षस्थानी प्रा. मनोहरराव धोंडे, उद्घाटक खा.डॉ. अजित गोपछडे, प्रमुख पाहुणे म्हणून मंत्रीदर्जाचे आमदार हेमंत पाटील, आ. आनंदराव बोंढारकर, माजी शिक्षण सभापती संजय बेळगे, शिवसेना जिल्हाप्रमुख बबनराव बारसे, गंगाधरराव बडुरे, माजी सभापती बालाजीराव पांडागळे, जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष सुनील शेट्टे, समितीचे स्वागताध्यक्ष तथा काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष गिरीधर पाटील डाकोरे, कार्याध्यक्ष शिवकुमार देशमुख ग्रामविकास अधिकारी, वैजनाथ तोनसुरे, विठ्ठल ताकबिडे, संजय कोठाळे, संतोष शेटकर, अनिल शेटकर, वीरभद्र बसापुरे, इंजि. अनिल माळगे, दिगंबर मांजरमकर आदी उपस्थित होते.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com